महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
- इलेक्ट्रिकल सुपरवायझर
- इलेक्ट्रिकल वायरमन
- टू-व्हीलर मेकॅनिक
- A.C. मेकॅनिक
- कॉम्प्युटर ऑपरेटर
- ॲटोमोबाईल टेक्निशियन
- मोटार वायडिंग
- फोर व्हीलर मेकॅनिक
- वेल्डर / प्लंबर
- कॉम्प्युटर हार्डवेअर

एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ८७ वा | सोमवार, दि. २७ ऑक्टोबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# आजवर इतका लबाड मुख्यमंत्री देशाने पहिला नाही

## 'फडणवीसांनी कमीत कमी माफी तर मागावी'; बच्चू कडूंनी सरकारला धरलं धारेवर

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** शेकऱ्याचं आयुष्यच काळं आहे. दिवाळीचं काय घेऊन बसलात त्यांनी दोन लाखाचे फटाके फोडले आणि शेकऱ्यांना पाच हजारात बुडवून टाकले. शेतकऱ्यांची तीळ मात्र कदर या सरकारला नाही. धर्म आणि जातीच्या राजकारणात शेतकरी हा छोटा केला आहे. शेतकऱ्यांसाठी सरकार काही करेल असे मला वाटत नाही, असं बच्चू कडू म्हणाले आहेत.



ते आज माध्यमांशी बोलत होते.

दुष्काळ पडल्यावर कर्जमाफी करू म्हणणारे देवेंद्र फडणवीस आता मार्चपर्यंत वेळ आहे, असं म्हणतात. देशात सगळ्यात लबाड बोलणारा मुख्यमंत्री कोण असेल तर देवेंद्र फडणवीस, अशी टीका बच्चू कडू यांनी केली. बनवाबनवी तर बनिया करत नाही, एवढी बनवाबनवी हे सरकार करत आहे, अस ते म्हणाले आहेत.

सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करत नाहीत आणि व्यापाऱ्यांना सांगतात हमीभावा पेक्षा कमी भावाने व्यापाऱ्यांना माल देऊ नका. मग उरलेला माल काय भाजपच्या कार्यालयात टाकायचा का? किती ही बनवाबनवी करताय. कर्जमुक्ती, हमीभाव हे जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत आमच्या डोक्यात निवडणुकीचा विचार नाही.

तेलंगणा सरकार हेक्टरी पाच हजार रुपये शेतकऱ्यांना देत आहे. नुकसान हो अथवा न हो. मग तुम्ही का देऊ शकत नाही, असं सवाल बच्चू कडू यांनी केला. तुम्ही शहराकडे जेवढे लक्ष देता त्याच्या 25% लक्ष ग्रामीण भागात देत नाही, शेतकरी हा जातीपातीत गुंडाळून ठेवायचा आणि शहराकडे लक्ष द्यायचं जाती-जातीत भांडण लावायचे आणि शहरा मात्र व्यवस्थित ठेवायचं, अशी या सरकारची व्यवस्था असल्याची टीका बच्चू कडू यांनी केली. सुरजागडचा प्रकल्प तेथील लोखंड रत्नागिरीत पाठवायचे म्हणून शक्तिपीठ महामार्ग यांना करायचा आहे, अशी टीका त्यांनी केली आहे.

सुरजागडच्या कंपनीचा शेअर तीन वर्षापूर्वी 6 रुपये होता. आता तो शेअर पंधराशे रुपये कसा झाला? यामध्ये कोणाची मिली भगत आहे. त्यामुळे जाऊ तिथे खाऊ अशी परिस्थिती या सरकारची आहे. गृह खाते मुख्यमंत्र्यांकडे असताना फलटण, नागपूरमध्ये अशा घटना घडतात. त्यामुळे अंकुश कुठे राहिला नाही, त्यामुळे हा राज्याचा गृहमंत्री जनतेचा नसून फक्त भाजपचा कार्यकर्त्यांच्या आहे, अशी टीका बच्चू कडू यांनी केली. फलटणच्या घटनेवर मुख्यमंत्र्यांनी राजीनामा नाही तर कमीत कमी माफी तर मागावी, असा टोलाही त्यांनी लगावला आहे.

# प्रभाग 10 ज्या रणांगणात मेजर तानाजी माने यांची जोरदार एन्ट्री

## 'अब की बार माने सरकार' ची मोठी चर्चा

## प्रभागातील कार्यकर्त्यांनी पक्षश्रेष्ठींकडे केली मेजर तानाजी माने यांच्या उमेदवारीची मागणी



**मोहोळ (साहिल शेख):-** सध्या मोहोळ शहरात सर्वाधिक चर्चेत हे दोन प्रभाग आहेत एक म्हणजे नगरपरिषदेच्या प्रभाग रचनेचा श्री गणेशा करणारा प्रभाग क्रमांक एक आणि दुसरा म्हणजे सर्वात शेवटचा राजकीय दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा असणारा प्रभाग क्रमांक दहा. प्रभाग क्रमांक दहा मध्ये सर्वसाधारण पुरुष आणि ओबीसी महिला अशी आरक्षण सोडत झाल्यानंतर सर्वसाधारण पुरुष प्रवर्गातून मेजर तानाजी माने यांच्या नावाची सुरू झालेली चर्चा दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे.

लष्करी म्हणजे देशसेवेतून निवृत्त झालेले माजी सैनिक मेजर तानाजी माने हे अत्यंत शांत आणि मनमिळावू स्वभावाचे लोकप्रिय व्यक्तिमत्व म्हणून या प्रभागात गेल्या दोन दशकापासून परिचित आहेत. अनेकांना मदतीचा हात देण्याबरोबर प्रत्येकाच्या सुखदुःखात सहभागी होण्याची माने परिवाराची भूमिकाच आजवर त्यांना विविध क्षेत्रात यशस्वी करताना दिसत आहे. एक सृजनशील सुशिक्षित आणि प्रभागातील सर्वसामान्य जनतेच्या कायम सुखदुःखात सहभागी होण्याची भूमिका घेणाऱ्या माने परिवाराला यावेळी नगरसेवक पदासाठी खुल्या प्रवर्गातून उमेदवारीची संधी मिळावी अशी माने समर्थकांची अपेक्षा आहे.

शेती आणि उद्योग क्षेत्रात नावलौकिक मिळवलेल्या माने परिवाराने अनेक सुशिक्षित बेरोजगारांच्या हाताला काम देण्याबरोबर दूध संकलन केंद्राच्या अद्यावत शीतकरण केंद्राची म्हणजे डॉकची निर्मिती करत पशुपालकांना मोठा दिलासा दिला आहे. त्यांचे सुपुत्र डॉ. किरण माने यांनी या परिसरातील युवकांचे मोठे संघटन करत आपल्या मनमिळाऊ स्वभावाबरोबर संघटन कौशल्याची चुणूक पक्षश्रेष्ठींना वेळोवेळी दाखवून दिली आहे. या प्रभागातील अनेक प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याने माने परिवार प्रयत्नशील असतो.

राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष नामदार राजन पाटील माजी आमदार यशवंत माने लोकनेते शुगरचे चेअरमन बाळराजे पाटील सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील यांच्याकडे विविध प्रश्नांसाठी अविरत पाठपुरावा करत राजकीय क्षेत्रातही सक्रिय असल्यामुळे मेजर माने यांना उमेदवारी मिळावी अशी त्यांच्या समर्थकांची अपेक्षा आहे. दरवर्षी विविध सांस्कृतिक आणि समाजपयोगी उपक्रम राबवून अनगरकर - पाटील परिवारातील सदस्यांना आमंत्रित करत या परिवाराने निष्ठेची नाळ अत्यंत निरपेक्ष भावनेने जपली आहे. त्यामुळे या जोडपक्ष निष्ठेची पोचपावती मेजर तानाजी माने यांच्या उमेदवारीच्या रूपाने माने परिवाराला नक्कीच मिळेल अशी अपेक्षा या पंचक्रोशीतील त्यांच्या समर्थकांना आहे.

# प्रभाग नऊ मध्ये स्थानिक उमेदवारीच्या मुद्द्यावरून श्रेया पवार रिंगणात उतरणार

## कागदावर विकास कामे झालेल्या जुन्या चौदा मधील नागरिक वैतागले

## चिखलाचे रस्ते, तुंबलेल्या गटारींचा प्रश्न ऐरणीवर येणार म्हणून



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ शहराच्या दक्षिण भागातील मोक्याचा आणि महत्त्वाचा प्रभाग असलेल्या प्रभाग नऊ मधून अनेक सर्वपक्षीय दिग्गजांनी निवडणूक लढवण्यासाठी पूर्वतयारीला प्रारंभ केला आहे. गेल्या अनेक वर्षापासून अगदी ग्रामपंचायत असल्यापासूनही या प्रभागातील बऱ्याच समस्या नगरपरिषद होऊनही जैसे थे असल्यामुळे या भागातील नागरिकांनी स्थानिक अस्मितेचा मुद्दा पुढे करत स्थानिक उमेदवारला प्राधान्य देण्याचा विचार केला आहे. प्रभाग चौदा आणि पंधरा या प्रभागांचा मिळून नवा प्रभाग नऊ तयार झाला आहे प्रभाग चौदा मधील रस्ते, पाणी, आरोग्य, गटार या समस्या भीषण आहेत. चौदाच्या विद्यमान नगरसेवकांनी किती कामे केली हे प्रभागातील जनतेला आता तोंडपाठ झाले आहे. त्यामुळे वैतागलेल्या जनतेने आता चांगल्या उमेदवारालाच मतदान करण्याचा निर्णय घेतला आहे.

या प्रभागातून स्थानिक मुद्द्यावर निवडणूक लढवण्याचा निर्णय श्रेया दिलीप पवार यांनी घेतला आहे. त्यांचे पती शिवसैनिक दिलीप पवार हे शिवसेनेच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षापासून या प्रभागातील सर्वसामान्यांचे प्रश्न अत्यंत तळमळीने आणि प्रभावीने सोडवत आले आहेत. युवा नेते दिलीप पवार यांनी पक्षाकडे रीतसर उमेदवारीची मागणी केली होती मात्र पक्ष स्तरावरून उमेदवारी न मिळूनही त्यांनी प्रामाणिकपणे पक्षाचे काम करत या प्रभागातून शिवसेनेचा नगरसेवक निवडून आणण्यासाठी प्रयत्न केले होते. त्यामुळे दिलीप पवार यांच्या पत्नी श्रेया पवार यांनाच उमेदवारी मिळावी अशी त्यांच्या समर्थकांची मागणी आहे.

दिलीप पवार यांचे सहकारी असलेले सुदाम शिंगाडे हे देखील या प्रभागातील रस्ते पाणी आरोग्य विषयक समस्यांसाठी सातत्याने धडपड करणारे कार्यकर्ते आहेत. त्यामुळे श्रेया पवार यांना उमेदवारी मिळाल्यास अथवा त्या अपक्षपणे रिंगणात उतरल्यास या प्रभागातील मोठ्या जनसंपर्काचा फायदा पवार यांना होणार आहे. सध्या पवार दाम्पत्याने प्रभागात कॉर्नर बैठका घेत प्रत्येक घरी जाऊन मतदारांशी संपर्क वाढवला आहे. त्यामुळे त्या निवडणूक लढवणार असल्याचे जवळपास आता निश्चित झाले आहे. आता त्या शिवसेनेकडून उमेदवारी मिळवतात की शिवसेनेने उमेदवारी नाकारल्यानंतर अन्य कोणत्या पक्षातून उमेदवारी घेऊन निवडणूक लढवतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# प्रभाग क्र.9 मधून महेश तथा महादेव गायकवाड अपक्ष निवडणूक लढवणार

## सर्वसामान्यांसाठीचा चेहरा सर्वसामान्यांसाठी मैदानात

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** राजकीय दृष्ट्या सातत्याने चर्चेत असलेल्या प्रभाग क्रमांक एक मधून मोहोळ शहरातील कृषी क्षेत्रातील युवा उद्योजक महेश (महादेव) गायकवाड हे अपक्ष स्वरूपात निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. त्यांनी याबाबतची घोषणा नुकतीच माध्यमांशी बोलताना केली. शारदा रोपवाटिकेच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षापासून ते शेतकरी बांधवांच्या संपर्कात आहेत. मोहोळ शहर परिसरातही त्यांचा विविध क्षेत्रात चांगला जनसंपर्क आहे. एक मनमिळावू आणि सर्व समावेशक व्यक्तिमत्व म्हणून महेश गायकवाड यांना ओळखले जाते. त्यामुळे महेश गायकवाड यांच्या निवडणुकीत उतरण्यामुळे या प्रभागातील राजकीय क्षेत्रात त्यांच्या निवडणूक लढवण्याची मोठी चर्चा सुरू झाली आहे.



या प्रभागातील रस्ते पाणी आरोग्यविषयक अनेक समस्या गेल्या अनेक वर्षापासून जैसे थे अवस्थेत आहेत. याबाबत लोकप्रतिनिधींकडे पाठपुरावा करूनही ते प्रश्न न सुटल्यामुळे ते सोडवणे गरजेचे आहे. त्यामुळे नगरसेवक पदाच्या माध्यमातून महेश (महादेव) गायकवाड नगर परिषदेकडे हे प्रश्न सोडवण्यासाठी निवडणुकीच्या ते रिंगणात उतरत असल्याचे महेश तथा महादेव गायकवाड यांनी सांगितले.

# मनोरुग्णाला अभ्यंग स्नान घालुन भाऊबीज केली साजरी

## मोहोळच्या नारीशक्ती फाउंडेशनच्या माध्यमातून सीमाताई पाटील यांचा उपक्रम

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ शहरात नारीशक्ती फाउंडेशनतर्फे या वर्षीची भाऊबीज अनोख्या पद्धतीने साजरी करण्यात आली. संस्थापिका सीमा पाटील यांनी सामाजिक संवेदनशीलतेचे दर्शन घडवत एका बेवारस मनोरुग्णाला अभ्यंग स्नान घालून, नवीन कपडे परिधान करून, ओवाळणी करून आणि दिवाळीचा फराळ खाऊ घालून अतिशय आगळ्यावेगळ्या आणि प्रेरणादायी पद्धतीने भाऊबीज साजरी केली.

मोहोळ शहरात अनेक बेवारस, मनोरुग्ण आणि निराधार लोक रस्त्यावर भटकताना दिसतात. काही जण मानसिक आघातातून जातात, उपचारांच्या अभावामुळे त्यांची अवस्था दयनीय होते. अशा लोकांना समाजाने माणूस म्हणून वागवले पाहिजे, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.



या वेळी एम. जे. प्रथम माणूस सेवा संस्था, सोलापूरचे मोहन तलकोलुल यांच्या टीमने त्या मनोरुग्ण महिलेचे केस कर्तन करून, स्नान घालून तिला नवजीवन दिले. कार्यक्रमाला मोहोळचे प्रसिद्ध अर्थोलॉजिस्ट डॉ. सुनील लवटे उपस्थित होते. त्यांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. तसेच डॉ. संग्राम गायकवाड यांनी त्याची आरोग्य तपासणी सेवा दिली.

यावेळी शिवदीपक प्रतिष्ठानचे शिवरत्न गायकवाड, युवा समाजसेवक तथा प्रथितयश वैद्यकीय तज्ञ डॉ. संग्राम गायकवाड, संतोष माळी, विजय गायकवाड, निशांत माळी, दीपाली साठे आणि प्रज्ञा माळी आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी मोहन तलकोलुल यांचा संतोष माळी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

"मानवता हा खरा धर्म आहे. जे रंजले, गांजले त्यांना माणुसकीचा हात द्यावा, हीच खरी दिवाळी आहे," असे मत यावेळी संस्थापिका सीमा पाटील यांनी यावेळी व्यक्त केले.

# ऊस उत्पादन आणि साखर कारखानदारीमुळेच ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट- ना. राजन पाटील

## माजी आमदार यशवंत माने आणि अण्णासाहेब देशमुख यांच्या हस्ते लोकनेते कारखान्याच्या गळीत हंगामाचा शुभारंभ

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** साखर कारखानदारीही केवळ राजकारणासाठी नसून ती ग्रामीण भागाची आर्थिक व्यवस्था बळकट करणारी आहे. सरकारने अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत साखर घेतल्याने तीचे भाव सरकार वाढू देत नाही. केवळ ३० टक्के लोक साखर खातात त्यांच्या करिता साखरेचे भाव वाढत नाही.एफआरपी बरोबरच साखरेची एमएसपी वाढली पाहीजे. तरच ऊसास जादा दर देता येतो.ऊस उत्पादकांनीही कोल्हापुरच्या दराच्या विचारा बरोबरच आपल्याकडील ऊसाची गुणवत्ता व रिकव्हरी कशी वाढेल या बाबी लक्षात घेऊन ऊसाचे उत्पादन घ्यावे. असे आवाहन राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष तथा लोकनेते कारखान्याचे संस्थापक माजी आमदार राजन पाटील यांनी केले. लक्ष्मीनगर येथील लोकनेते बाबुराव पाटील साखर कारखान्याच्या २२ व्या गळीत हंगामाचा प्रारंभ आज कारखाना स्थळावर प्रगतशील शेतकरी आण्णासाहेब गणपतराव देशमुख यांच्या हस्ते ऊसाच्या पहिल्या मोळीचे पूजन करून गव्हाणीत टाकून करण्यात आला. त्याप्रसंगी राजन पाटील बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी आमदार यशवंत माने होते.

प्रारंभी पाटकुल (ता. मोहोळ) येथील ऊस उत्पादक शेतकरी बाळासाहेब वसेकर व त्यांच्या पत्नी मनिषा या उभयतांनी सत्यनारायणाची



पूजा केली. त्याचे पौरोहित्य बाजीराव जोशी यांनी केले.

यावेळी बोलताना संस्थापक राजन पाटील पुढे म्हणाले की ऊस उत्पादकांना चार हजार रुपये दर देण्याची कारखान्यांची क्षमता निर्माण करण्यासाठी साखरेसह इतर उपपदार्थांच्या किंमती वाढवल्या पाहीजेत. सरकारने धोरणे बदलली पाहीजेत असे प्रतिपादन सहकार परिषदेचे अध्यक्ष ना राजन पाटील यांनी येथे केले. यावेळी मान्यवरांनी लोकनेते (स्व.) बाबुराव आण्णा पाटील अनगरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार वाहून अभिवादन केले याप्रसंगी आण्णासाहेब देशमुख ,माजी आमदार यशवंत माने दीपक माळी देवानंद गुंड यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी चेअरमन बाळराजे पाटील, संचालक अजिंक्यराणा पाटील, तावजी पाटील, जालींदर लांडे, नाना डोंगरे, विक्रांत माने, प्रकाश चवरे, अशोक चव्हाण, शुक्राचार्य हावळे, मदनसिंह पाटील, संदीप पवार, संभाजी चव्हाण, दीपक माळी, अस्लम चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी ओमप्रकाश जोगदे, आदीसह तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकरी कारखान्याचे अधिकारी पदाधिकारी कर्मचारी उपस्थित होते. संचालक प्रकाश चवरे यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले

**सर्वांबरोबर ऊस दर देणार..**

२६५ या ऊसाचे वाण सोडून ८६०३२ अगर तत्सम ऊसाच्या वाणास शंभर रुपए जादा दर ८६०३२ या वाणाच्या ऊस लागवडीसाठी बीनव्याजी ऊस बेणे देणार आहोत. कारखाना सुरु होताच सभासदांना साखरेचे वाटप करण्यात येणार आहे.शेतकऱ्यांनी एफआरपीसाठी एकरकमेची मागणी न करता गुजरात प्रमाणे टप्पाटप्पाने ती घेतल्यास शेतकऱ्यांचा व कारखान्यांचाही फायदा होतो. शेतकर्यांना त्यांच्या उत्पादनांचा रास्त दर मिळायलाच पाहीजे. ऊस उत्पादकांचे हित साधण्याबरोबर जागतिक बाजारातील साखरेचे दरातील चढ-उतारामुळे मोठी कसरत करून कुशल अर्थ नियोजनाने साखर कारखाने आणि ऊस शेती टिकवणे आवश्यक आहे.

**ना.राजन पाटील,** अध्यक्ष राज्य सहकार परिषद

साखर क्षेत्राचा गाढा अभ्यास असलेल्या संस्थापक राजन पाटील यांनी कारखान्याच्या तांत्रिक बाबींवर देखील चांगले लक्ष दिले आहे. चेअरमन बाळराजे पाटील, संचालक अजिंक्यराणा पाटील यांच्या कुशल नियोजनातून कारखान्याने यंदा हार्वेस्टिंगच्या माध्यमातून जास्तीत जास्त उसाची तोडणी करण्याबरोबर अत्याधुनिक हार्वेस्टिंगशी अनुकूल असलेल्या गव्हाणीची देखील निर्मिती केली आहे. त्यामुळे यंदा कारखाना गतिमान कार्यशैलीने चालुन शेतकऱ्यांचा ऊस वेळेत कारखान्याला येणार आहे. केवळ कारखान्याची उभारणी करून न थांबता दरवर्षी विक्रमी उसाचे गाळप करत तालुक्यामध्ये सातत्याने अव्वल क्रमांक मिळवणाऱ्या लोकनेते पॅटर्नचा आदर्श जिल्ह्यातील इतर कारखान्यांनी घ्यावा.

**यशवंत माने,** माजी आमदार मोहोळ

## संपादकीय

# 'अब्रू कोणाची झाकायची?'

**सा**ताऱ्याच्या उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टर डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येनंतर महाराष्ट्र हादरला आहे. पण या घटनेत आणखी हादरवणारा भाग म्हणजे, पोलिस अधीक्षक तुषार दोषी यांनी माध्यमांसमोर केलेले विधान. जर खरोखर त्यांनीच अशी माहिती प्रसारमाध्यमांना दिली असेल, ज्यातून मृत तरुणीच्या चारित्र्यावरच प्रश्नचिन्ह उभं राहील, तर ही केवळ निष्काळजीपणा नाही, तर नैतिक दिवाळखोरी आहे. पोलीस हे राज्याचे रक्षक असतात. पण जेव्हा रक्षकच भक्षकाचे काम करू लागतात, तेव्हा समाजाचा पोलीस यंत्रणेवरील विश्वासच कोसळतो. तपास अर्धवट असताना, कोणतीही निष्कर्ष निघालेले नसताना अशा संवेदनशील प्रकरणात पीडितेच्या चारित्र्याविषयी बोलणं म्हणजे तिच्या आत्म्याचा दुसऱ्यांदा खूनच आहे. मुख्यमंत्री म्हणजेच गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची "अब्रू वाचवण्यासाठी" एका मृत तरुणीची अब्रू उघड्यावर टांगण्याचा प्रयत्न झाला, अशी जनतेची भावना आहे. सरकारला झाकण्यासाठी पोलिस अधिकारी माध्यमांचा वापर करतात आणि त्याच वेळी पीडितेला दोषी ठरवतात. ही परिस्थिती लोकशाहीत लाजिरवाणी आहे. सगळ्यात वेदनादायक प्रश्न असा की, डॉ. मुंडे गेल्या अनेक दिवसांपासून तक्रारी देत होत्या, छळाबद्दल सांगत होत्या, पण त्या तक्रारींवर कोणती कारवाई झाली? त्या वेळी पोलिस अधिकारी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी डोळेझाक का केली? जर योग्य वेळी हस्तक्षेप झाला असता, तर आज ती डॉक्टर आपल्या कुटुंबात जिवंत असती.

राज्य सरकारने या प्रकरणाचा वापर राजकीय ढाल म्हणून न करता, पोलिस यंत्रणेमध्ये प्रामाणिक आत्मपरीक्षण करायला हवे. तुषार दोषी यांनी जर खरोखर माध्यमांशी गैरजबाबदारपणे संवाद साधला असेल, तर त्यांचे केवळ निलंबन नव्हे, तर बडतर्फी अनिवार्य आहे. अन्यथा, उद्या प्रत्येक पीडित स्त्रीला न्याय मागण्याआधी विचार करावा लागेल, "माज्या चारित्र्यावर प्रश्न उभे केले जातील का?"

समाजाच्या नजरेत डॉ. संपदा मुंडे दोषी नाहीत; दोषी आहेत ते, जे तिच्या वेदनेवर राजकारण करतात. एका तरुणीच्या मृतदेहावर सत्ता आणि प्रतिष्ठेची पोती शिवण्याचे काम करणाऱ्यांना जनता कधीच माफ करणार नाही. असे विरोधक सांगत आहेत.

# द्राक्ष पंढरीवर आभाळाचे संकट, दिवाळीची काळोखी सावली

**दि**वाळीचा सण, आनंदाचा, प्रकाशाचा आणि संपन्नतेचा प्रतीक. पण यंदा द्राक्ष पंढरीसाठी दिवाळी उजाडली ती काळ्या ढगांच्या आच्छादनाखाली. लक्ष्मीपूजनाच्या वेळीच वरुणराजाने संतापून पावसाचे धो-धो फटकारे हाणले आणि संपूर्ण द्राक्ष विभागात संकटाचे सावट पसरले.

सहा महिन्यांच्या अखंड पावसाळ्याने शेतकऱ्यांची कंबर मोडली आहे. एकीकडे प्लॉट उभे राहिले, तर दुसरीकडे ज्यांच्या द्राक्षमळ्यांवर थोडासा माल शिल्लक होता, त्यावरही निसगार्ने पुन्हा घाव घातला. या अतिवृष्टीने द्राक्ष उत्पादकांच्या स्वप्नांवर चिखल उडवला आहे. 'आभाळच फाटलं तर ठीगळ कुठे लावायचं?' हा प्रश्न आज प्रत्येक शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर उमटलेला आहे. द्राक्ष उद्योग हा महाराष्ट्राच्या शेती अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. जगभरात निर्यात होणाऱ्या द्राक्षाच्या दजार्ची शान हीच द्राक्ष पंढरी. पण गेल्या काही वर्षात निसर्गाच्या अनियमित लहरींनी आणि हवामान बदलाच्या दुष्परिणामांनी या उद्योगावर गंभीर प्रश्नचिन्ह उभं केलं आहे.

फयानचं चक्रीवादळ, गारपीट, दुष्काळ या सगळ्या आपत्तींचा सामना बळीराजाने खंबीरपणे केला. पण सततच्या पावसाने आता त्याचा आत्मविश्वास डळमळीत झाला आहे. कारण एकीकडे खर्चाचा बोजा आणि दुसरीकडे बाजारातील अनिश्चितता या दोन्हींच्या कात्रीत शेतकरी सापडला आहे.

शासनाने या स्थितीची गांभीयार्ने दखल घ्यावी. केवळ घोषणा नव्हे, तर तत्काळ मदत, विमा दावे, पुनर्वसन आणि हवामान सुसंगत शेती तंत्रज्ञानाचा प्रसार ही काळाची गरज आहे. द्राक्ष उत्पादक हा केवळ शेतकरी नाही, तो देशाच्या निर्यात अर्थव्यवस्थेचा प्रतिनिधी आहे.

दिवाळीच्या दिव्यांपेक्षा आता बळीराजाच्या घरात आशेचा प्रकाश पेटवण्याची वेळ आली आहे. अन्यथा 'दिवाळी पावसातच गेली' ही ओळ इतिहासात नोंदली जाईल आणि ती केवळ हवामानाची नव्हे, तर शासनाच्या निष्क्रियतेची साक्ष देईल.

## प्रबोधन

# वृद्धांचा विचार । असे परिपक्व ।

**वि**चारवंतांनी आदर्श मातेची व्याख्या केली. आदर्श पिता व्याख्याबद्ध केला. आदर्श तरुणाची व्याख्या केली. पण आदर्श वृद्ध कसा असतो, आदर्श वृद्ध स्त्री कशी असते, ते सांगितलेलं नाही. एका विचारवंताने तारुण्याचे तीन 'त'कार तेजस्विता, तपस्विता आणि तत्परता असतात, असं म्हटलं, पण वृद्धांचे चार 'व'कार सांगणं त्यांना शक्य झालं नाही. वृद्धांचे चार 'व'कार विचारीपणा, व्यवहारीपणा, व्यासंगीपणा आणि व्रतस्थपणा ह्याहून वेगळे असूच शकत नाहीत. तरुण विकारी असतील, पण वृद्ध व्यक्ती जन्मभराचा विचार करीत असल्याने विचारी, व्यवहारी असायला हवी. व्यवहारात ते तरुणाचा सहज पराभव करू शकतात. वाचून-लिहून वृद्धांचा व्यासंग वाढला नसेल, पण ऐकून का असेना, त्यांचा बहुश्रुतपणाचा व्यासंग वाढलेला असतो आणि व्रतस्थपणा हाच आपला खरा आधार आहे, हे वृद्धांना अनुभवाने कळलेलं असतं.

तरुणांना मानणारं जग मात्र वृद्धांचा अवमान करतं, हे एक कटू सत्य आहे. इमर्सन म्हणतात,'वृद्धांशी वाईट वागणाऱ्यांनी आपणही एके दिवशी वृद्ध होणार आहोत, हे लक्षात घ्यावं.' तरीही बऱ्याच वृद्धांना उपेक्षिताचं जीवन जगावं लागतं! डिझरायली हे विचारवंत म्हणूनच म्हणतात,'बालपण ही चूक आहे, तारुण्य हा संघर्ष आहे, तर वृद्धावस्था म्हणजे पश्चात्ताप आहे.' ते काही खोटं नाही. वाढतं वय, ढासळणारी शारीरिक-मानसिक शक्ती, अचानक हल्ला करणारे आजार, घरीदारी होणारी उपेक्षा आणि मरणाची टांगती तलवार; या सर्व कारणांमुळे मुळातून भाविक, धार्मिक असणारे वृद्ध तर अधिकच भक्तिमार्गी होतात. तर जन्मभर देवाधर्मापासून अलिप्त असलेले, बुद्धिवादी वृद्धसुद्धा हळूहळू मंदिरांच्या आश्रयाला नकळत येतातच. खरं तर ही वृद्धांची नव्हे, समाजाची, राष्ट्राची शोकांतिका असते. नव्या पिढीला राष्ट्राचं भवितव्य म्हणणं चुकीचं नाही. पण वृद्धांना भूतकाळ म्हणणं मात्र बरोबर नाही. कवी टेनिसनने तर वृद्धावस्था जमेला धरलेलीच नाही. ते म्हणतात,'कार्यमग्न व्यक्ती मृत्यूपूर्वी थोडा वेळच वृद्ध होते.' आपल्या वार्धक्याची खंत बाळगणाऱ्या वृद्धांना उपदेश करताना फादर वॉलेस म्हणतात, 'कोणाही वृद्धाने आपण आता काही करू शकत नाही, असं म्हणू नये. कारण ते प्रेम करू शकतात. सद्भावना प्रकट करू शकतात, याहून अधिक महत्त्वाचं जगात दुसरं काय असतं?' अशा वृद्ध व्यक्ती हे राष्ट्राचं अमोल धन नाही का? देशाच्या फाळणीनंतरच्या हिंसाचारातील नौखालीतील दुःखितांचे अश्रू पुसणारे गांधीजी तेव्हा वयोवृद्धच होते. सेवा-कार्य करणारी म्हातारी माणसं छान पिकतात आणि अधिक गोड होत जातात.

ती समाजाला शिरोधार्य होतात. तंटामुक्त गावाची निर्मिती अशा वृद्ध व्यक्तींकडूनच शक्य असते. व्यसनमुक्त समाजनिर्मितीचे ध्येय ह्या व्यक्ती युक्ती प्रयुक्तीने नक्की साध्य करू शकतात. भावी रक्तपाताला, सामाजिक अशांततेला कारणीभूत होतील, असे गावकऱ्यांमधील गैरसमज बेताबेताने दूर करण्यात ही वृद्ध माणसं खात्रीने यशस्वी होऊ शकतात. गावाचा स्वच्छतेचा प्रश्न असो वा पाणीपुरवठ्याचा प्रश्न असो. कोणत्याही प्रश्नाची योग्य उत्तरं शोधण्याचं कौशल्य वृद्ध व्यक्तींमध्ये असतंच असतं. गावातील किंवा गल्लीमधील वृद्धांनी एकत्र येऊन शिस्तबद्ध प्रयत्न केले, तर काय साध्य होणार नाही ? थॉमस फुलर हे विचारवंत म्हणतात, 'वाढत्या वयाबरोबर वृद्धांची गती व शक्ती कमी होते हे खरं आहे. पण चातुर्य,हुशारी आणि कौशल्यं वाढत जातात.' समाजाचं कल्याण करण्याच्या कार्यात देशभरातील सर्व वयोवृद्ध व्यक्ती गुंतल्या, तर समाज समंजस आणि परिपक्व व्हायला वेळ लागणार नाही. म्हणून लक्षात घ्या ठेवा –

वृद्धांचा विचार । असे परिपक्व ।
जगा हवे सत्त्व । नको कोंडा ॥ १
लोक मानतील । वृद्धांचे सांगणे ।
सत्य गावे गाणे जाण्याआधी ॥ २
पटले मनाला । तेच सांगा जगा ।
अध्यात्माचा दंगा । थांबवा तो ॥ ३
आयुष्यात सत्य । तुम्हा जे मिळाले ।
होते का भेटले । देव त्यात ॥४
कानउघाडणी । जगाची करावी ।
ज्येष्ठता शोभावी । तरी तुम्हा ॥५
सन्मार्ग लोकांना दाखवू शकता ।
भरवसा आता । तुमचा हो ॥६



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# कोर्टीचे सरपंच राजाभाऊ पवार यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर तालुक्यातील कोर्टी गावचे सरपंच आणि युवा उद्योजक राजाभाऊ पवार यांचा वाढदिवस मोठ्या धुमधडाक्यात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने येथील ज्येष्ठ आणि गरजू नागरिकांना फराळ वाटप तसेच रोख स्वरूपात मदत करण्यात आली. वृक्षारोपण, रक्तदान शिबिर आणि डोळ्यांचे शिबिर असे सामाजिक उपक्रम राबवण्यात आले. राजाभाऊ पवार यांच्यासारखा सरपंच आम्हाला पुन्हा पुन्हा मिळावा, अशी प्रार्थना यावेळी नागरिकांनी केल्याचे पहावयास मिळाले. सध्या सरपंच म्हटले की, राजकारणी पुढाऱ्याचे चित्र पुढे उभे राहते. परंतु कोर्टी गावचा सरपंच स्वतः उद्योगपती आहे. या गावच्या इतिहासात प्रथमच असा सरपंच मिळाला, की ज्याने अनेक उपक्रम गावात राबवले. नागरिकांनी या उपक्रमांचा भरभरून फायदा घेतला. नागरिकांना मिळणाऱ्या सर्व सुविधा, सवलती मिळवून मिळवून देणारा दिलदार सरपंच अशी त्यांची ख्याती झाली असल्याचे मत, माजी सरपंच रामभाऊ मिसाळ यांनी व्यक्त केले.

शनिवार दि.25 ऑक्टोबर रोजी सकाळी येथील ग्रामपंचायत कार्यालयासमोर , सरपंच पवार यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रमांना सुरुवात झाली. वृक्षारोपण, रक्तदान शिबिर आणि नेत्र रोग निदान शिबिर हे उपक्रम राबवण्यात आले. याप्रसंगी ग्रामस्थांनी सरपंच राजाभाऊ पवार यांचा पुष्पहार घालून सन्मान केला.

याच दिवशी रात्री आठ वाजता कोर्टी ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा अभिष्टचिंतन सोहळा संपन्न झाला. यावेळी गावातील जेष्ठ नागरिक, विधवा महिला तसेच दिव्यांग बांधवांना रोख स्वरूपात आर्थिक मदत तसेच दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी कोर्टी गावचे माजी सरपंच रामभाऊ मिसाळ, शिक्षक बापूसाहेब मिसाळ, ग्रामपंचायत सदस्य बाळू होनकडे, हाके, बबलू शेख , उपसरपंच मुन्ना शेख, यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माझं माहेर

बाप गाव कारभारी
त्यांचा रुबाबही भारी
सारा गाव सांभाळूनी
लक्ष ठेवी लेकीवरी

बाप भासतो विठ्ठल
आई रुक्मिणी वाटते
जन्मदाते माय बाप
मज स्वप्नात भेटते

आई लक्ष्मीचेच रूप
हाती अमृताची गोडी
कष्ट करिते ती खूप
सोडविते सारी कोडी

माज्या माहेरात भाऊ
सर्जा राजाला हाकतो
त्याचा चिरेबंदी वाडा
धन धान्यांनी वाहतो

गोड भावजय माझी
सडा अंगणी शिंपिते
घरा दाराची ती शोभा
रांगोळीने वाढविते

माझी लहान धाकटी
गोरी गोमटी बहीण
जणू मायेचा सागर
जपे नात्यातील वीण

माझा लाडका तो भाचा
भासे गोकुळीचा लाल
खोडकर नटखट
आठवतो त्याचा गाल

आहे सासर वासीन
परी माहेराची आस
माझं माहेर खरचं
साऱ्या दुनियेत खास

**श्री.युवराज गोवर्धन जगताप**
काटेगाव ता बार्शी
जिल्हा सोलापूर
8275171227

## वात्रटिका

### मोहोळ आणि धिंगाणा

आरोपांची मालिका सुरू
आणि पुण्यात मोहोळ उठले...
कोणाची अडचण वाढली
कोणाला आरोप दंगेखोर वाटले...
सारवासारव केली तरी
म्हणे कार्यवाही होणार...
डील रद्द नाही झाले तर
नक्कीच उपोषण होणार...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

# जागतिक दृकश्राव्य वारसा दिन : समाजाच्या सामाजिक-सांस्कृतिक स्मृतींचे संवर्धन

**२७** ऑक्टोबर हा दिवस दरवर्षी जगभरात 'जागतिक दृकश्राव्य वारसा दिन' (World Day for Audiovisual Heritage) म्हणून साजरा केला जातो. या दिवसाची स्थापना युनेस्कोने २००५ साली केली. त्यामागचा प्रमुख हेतू म्हणजे मानवजातीच्या दृकश्राव्य वारशाचे संवर्धन, संरक्षण आणि पुनरुज्जीवन करणे. चलचित्रे, ध्वनिमुद्रिका, रेडिओ कार्यक्रम, दूरदर्शन वार्तापत्रे, माहितीपट, लोककलेवरील दृश्य-दस्तऐवज, डिजिटल संग्रह हे सर्व मानवाच्या सामाजिक प्रवासाचे मौल्यवान दस्तऐवज आहेत. आधुनिक समाजातील संवाद, विचार, भावभावना, संस्कृती, आणि सामाजिक परिवर्तन यांचे प्रतिबिंब या दृकश्राव्य माध्यमांमध्ये दिसते. त्यामुळे या वारशाचे जतन करणे हे केवळ सांस्कृतिकच नव्हे, तर सामाजिक ओळख जपण्याचे कार्य आहे.

दृकश्राव्य वारसा म्हणजे केवळ कलात्मक निर्मिती किंवा मनोरंजनाचे साधन नव्हे; तो समाजाच्या स्मृतींचा आणि अनुभवांचा भांडार आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, प्रत्येक समाजाची ओळख ही त्याच्या सांस्कृतिक स्मृतींवर आधारित असते. ज्या समाजाने आपला वारसा जतन केला नाही, तो समाज कालांतराने विस्मृतीत जातो. दृश्य आणि श्राव्य माध्यमे ही स्मृतींची सजीव रूपे आहेत. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात छायाचित्रण आणि चलचित्रांचा उदय झाला. २०व्या शतकात रेडिओ, टेपरेकॉर्डर, दूरदर्शन आणि नंतर संगणक व इंटरनेट या नव्या माध्यमांनी मानवी संवादपद्धतीत आमूलाग्र बदल घडवले. या सर्व माध्यमांनी इतिहासाचे, संस्कृतीचे आणि सामाजिक परिवर्तनाचे चित्रण केले, परंतु त्याच वेळी त्यांचे संवर्धन न झाल्यास ते नष्ट होण्याचा धोका निर्माण झाला. म्हणूनच युनेस्कोने जगभरातील दृकश्राव्य वारसा जतन करण्याचे आवाहन केले आहे.

समाजाच्या इतिहासाचे आणि संस्कृतीचे जतन हे फक्त पुस्तकांद्वारे शक्य नाही; दृकश्राव्य माध्यमे त्या अनुभवांना जिवंत ठेवतात. भारतातील सामाजिक आणि सांस्कृतिक प्रवासाचा विचार केला तर १९१३ साली दादासाहेब फाळके यांनी तयार केलेला 'राजा हरिश्चंद्र' हा चित्रपट भारतीय दृकश्राव्य वारशाचा प्रारंभबिंदू ठरला. या चित्रपटाने केवळ भारतीय चित्रपटसृष्टीची सुरुवात केली नाही, तर समाजातील नैतिक मूल्यांची अभिव्यक्तीही केली. पुढील काळात स्वातंत्र्यसंग्राम, राष्ट्रनिर्मिती, ग्रामीण पुनर्रचना, औद्योगिकीकरण, स्त्री-पुरुष समता, जातीविरोधी चळवळी आणि सामाजिक न्याय या विषयांवर तयार झालेल्या चित्रपटांनी आणि रेडिओवरील कार्यक्रमांनी भारतीय समाजाचा जिवंत इतिहास निर्माण केला. आकाशवाणी, दूरदर्शन, वृत्तपट आणि माहितीपट हे समाजाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचे साक्षीदार ठरले. समाजशास्त्राच्या दृष्टीने दृकश्राव्य वारसा हे सामाजिक परिवर्तनाचे आणि सामूहिक स्मृतींचे शक्तिशाली माध्यम आहे. दृश्य आणि श्राव्य साधनांद्वारे समाज स्वतःची ओळख निर्माण करतो, बदलत्या मूल्यांना प्रतिसाद देतो आणि सामाजिक वास्तवाचे प्रतिबिंब दाखवतो. समाजशास्त्रज्ञ मॉरिस हाल्बवाच्स (Maurice Halbwachs) यांनी मांडलेल्या 'सामूहिक स्मृती' (Collective Memory) या संकल्पनेनुसार, समाजाचे अस्तित्व हे त्याच्या सामूहिक स्मृतींवर आधारित असते. त्या स्मृती दृकश्राव्य माध्यमांद्वारे जिवंत राहतात. एखाद्या समाजाने आपल्या भूतकाळातील अनुभव, संघर्ष, विचार, आणि भावनिक क्षण जतन केले, तर तो समाज आपली ओळख टिकवू शकतो. परंतु ही स्मृती नष्ट झाली, तर समाज आपल्या मूळपासून तुटतो. त्यामुळे दृकश्राव्य वारसा जतन करणे म्हणजे सामूहिक स्मृतींचे संरक्षण होय.

दृकश्राव्य साधनांचे समाजशास्त्रीय महत्त्व यामध्ये तीन पैलू आहेत. पहिला म्हणजे संस्कृतीचे संवर्धन. लोककला, पारंपरिक गाणी, नृत्य, नाटक, लोककथा, बोलीभाषा आणि लोकगीतांच्या ध्वनिमुद्रिका समाजाच्या सांस्कृतिक अस्तित्वाचे प्रतीक आहेत. महाराष्ट्रातील भारूड, लावणी, तमाशा, गोंधळ, कीर्तन आणि लोकनाट्य या परंपरांचे जतन केवळ लिखित स्वरूपात नव्हे तर दृकश्राव्य माध्यमांतून होणे आवश्यक आहे. दुसरा पैलू म्हणजे इतिहासाचे दस्तऐवजीकरण. चित्रफिती, रेडिओ भाषणे, माहितीपट आणि वार्तांकन ही समाजातील बदलांची नोंद ठेवतात. महात्मा गांधीजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे, स्वातंत्र्यसंग्रामातील चलचित्रे, स्वातंत्र्यानंतरची दृश्ये, किंवा ग्रामीण विकासाच्या योजनांवरील माहितीपट ही सर्व उदाहरणे समाजाच्या ऐतिहासिक आणि राजकीय प्रवासाचे पुरावे आहेत. तिसरा पैलू म्हणजे सामाजिक परिवर्तनाचे प्रतिबिंब. चलचित्रे आणि रेडिओ कार्यक्रमांनी स्त्रीवाद, जातीय विषमता, आर्थिक विषमता, शिक्षण आणि पर्यावरण यांसारख्या विषयांवर चर्चा घडवली. सत्यजित रे, बिमल रॉय, श्याम बेनेगल यांसारख्या दिग्दर्शकांच्या कलाकृती समाजातील संघर्ष आणि परिवर्तनाचे समाजशास्त्रीय विश्लेषण साकार करतात.

तथापि, या मौल्यवान वारशासमोर गंभीर आव्हाने उभी आहेत. दृकश्राव्य सामग्री जतन करणे हे तांत्रिक दृष्ट्या आणि आर्थिकदृष्ट्या अत्यंत गुंतागुंतीचे कार्य आहे. जुने चित्रपट सेल्युलॉईड फिल्मवर बनलेले असल्याने ते रासायनिक प्रक्रियेमुळे नष्ट होतात. ध्वनिमुद्रिका, टेप्स आणि व्हिडिओ कॅसेट्स कालांतराने खराब होतात. अनेक मौल्यवान चलचित्रे आणि रेडिओ कार्यक्रम आज कायमचे हरवले आहेत. युनेस्कोच्या २०२३ च्या अहवालानुसार, जगभरातील सुमारे ४४ टक्के दृकश्राव्य संग्रह नष्ट होण्याच्या धोक्यात आहेत. भारतातही अशीच स्थिती असून, राष्ट्रीय चलचित्र संग्रहालय (NFAI), प्रसार भारती, आणि भारतीय राष्ट्रीय ध्वनिचित्र संसाधन केंद्र या संस्था डिजिटल माध्यमांतून या वारशाचे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न करत आहेत. तथापि, या प्रक्रियेत अनेक अडचणी आहेत, निधीअभाव, तांत्रिक उपकरणांचा अभाव, प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे लोकजागरूकतेचा अभाव. सामान्य जनतेला या वारशाचे महत्त्व फारसे ठाऊक नाही. लोक आपल्या दैनंदिन जीवनातील जुन्या ध्वनिमुद्रिका, छायाचित्रे, नाटकांची रेकॉर्डिंग्ज किंवा गावातील लोककलेचे व्हिडिओ जतन करत नाहीत. परिणामी, अनेक मौल्यवान सांस्कृतिक घटक कालांतराने हरवतात. हे सांस्कृतिक विस्मरण समाजाच्या सामूहिक स्मृतींना गळ लावते. आजच्या डिजिटल युगात दृश्य-श्राव्य सामग्रीची निर्मिती प्रचंड प्रमाणात होत आहे. प्रत्येकजण आपल्या मोबाईल फोनवर व्हिडिओ तयार करतो, आवाज रेकॉर्ड करतो, आणि सोशल मीडियावर शेअर करतो. परंतु ही सामग्री क्षणभंगुर असते. काही दिवसांत ती नष्ट होते, डिलीट होते किंवा सर्व्हर क्रॅशमुळे हरवते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, ही 'डिजिटल विस्मृती'आपल्या काळाची एक नवी शोकांतिका आहे. भविष्यकालीन संशोधकांना आजचा काळ समजून घ्यायचा असल्यास या काळातील दृश्य-श्राव्य नोंदी आवश्यक असतील. त्यामुळे डिजिटल सामग्रीचे दस्तऐवजीकरण आणि सुरक्षित संग्रहण हे आज अत्यंत गरजेचे आहे. युनेस्कोमार्फत २००५ मध्ये २७ ऑक्टोबर हा दिवस अधिकृतपणे 'जागतिक दृकश्राव्य वारसा दिन' म्हणून घोषित करण्यात आला. युनेस्कोच्या "Memory of the World Programme" या उपक्रमांतर्गत जगभरातील मौल्यवान दृकश्राव्य कागदपत्रांचे डिजिटल स्वरूपात संवर्धन केले जाते. भारतातील महात्मा गांधींजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चित्रफिती, ह्यभारताच्या स्वातंत्र्य चळवळीवरील ध्वनिमुद्रिकाह्ल, आणि ह्यआकाशवाणी वारसा संग्रहह्ल हे या कार्यक्रमाचा भाग आहेत. या प्रयत्नांमुळे समाजातील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक घटक पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचतील.

भारतात सरकारने २०१७ मध्ये National Digital PreservationProgramme सुरू केले, ज्याद्वारे देशातील दृकश्राव्य वारशाचे डिजिटल जतन करण्याचे उद्दिष्ट आहे. नॅशनल फिल्म आर्काईव्ह ऑफ इंडिया (NFAI) ने अनेक चित्रपटांचे पुनरुज्जीवन केले आहे. तसेच Film Heritage Foundation, Indira Gandhi National Centre for the Arts आणि विविध विद्यापीठेही या क्षेत्रात कार्यरत आहेत. आकाशवाणी आणि दूरदर्शनने आपल्या जुन्या ध्वनिमुद्रिका आणि कार्यक्रमांचे डिजिटल रूपांतरण सुरू केले आहे. परंतु ग्रामीण आणि स्थानिक लोककलेवरील ध्वनिचित्र नोंदी अजूनही अपुऱ्या आहेत. त्यामुळे राज्यस्तरावर आणि स्थानिक पातळीवर ग्रामीण व आदिवासी संस्कृतीचे दस्तऐवजीकरण आवश्यक आहे.

शैक्षणिक क्षेत्रात दृकश्राव्य वारशाचे महत्त्व अपार आहे. शिक्षण प्रक्रियेत दृकश्राव्य माध्यमांचा वापर विद्यार्थ्यांना समाज आणि संस्कृती समजून घेण्यासाठी प्रभावी ठरतो. इतिहास, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, आणि लोकसंस्कृतीच्या अभ्यासात चलचित्रे आणि ध्वनिमुद्रिका या संशोधनाच्या प्रमुख साधनांपैकी एक आहेत. त्यामुळे दृकश्राव्य वारशाचे जतन हे शिक्षणक्षेत्रातील गुंतवणुकीचा भाग असला पाहिजे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, दृकश्राव्य वारसा म्हणजे समाजाच्या आत्म्याचे दृश्य-श्राव्य प्रतिबिंब आहे. तो समाजाच्या भावनांचा, संघर्षांचा आणि आकांक्षांचा साक्षीदार आहे. आपण जर या वारशाचे जतन केले नाही, तर आपल्या संस्कृतीची आणि सामाजिक ओळखीची मुळे हरवतील. २७ ऑक्टोबरचा हा दिवस आपल्याला स्मरण करून देतो की स्मृतींचे जतन म्हणजेच संस्कृतीचे रक्षण आणि संस्कृतीचे रक्षण म्हणजेच समाजाचे अस्तित्व टिकवणे. आज आपल्यासमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे या वारशाबद्दल जागरूकता निर्माण करणे. प्रत्येक नागरिकाने आपल्या घरातील, गावातील, किंवा संस्थेतील जुने ध्वनिचित्र दस्तऐवज जतन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रत्येक राज्याने आणि शैक्षणिक संस्थांनी स्थानिक पातळीवर 'दृकश्राव्य वारसा संकलन केंद'स्थापन करणे आवश्यक आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हे केवळ सांस्कृतिक उपक्रम नसून सामाजिक जबाबदारीचे प्रतीक आहे. कारण समाजाची ओळख त्याच्या स्मृतींवर उभी असते, आणि या स्मृतींची जपणूकच त्याच्या टिकाऊ अस्तित्वाची हमी देते. म्हणूनच, जागतिक दृकश्राव्य वारसा दिन हा केवळ औपचारिक सण नसून आपल्या सामूहिक स्मृतींचे जतन करण्याची आणि समाजाच्या सांस्कृतिक ओळखीचे रक्षण करण्याची आठवण करून देणारा दिवस आहे. आपण या वारशाचे संवर्धन केले तर आपल्या पुढील पिढ्यांना इतिहासाचा, संस्कृतीचा आणि मानवी समाजाच्या उत्क्रांतीचा खरा अनुभव घेता येईल. हा वारसा म्हणजे आपली ओळख, आपली स्मृती आणि आपला आत्मा होय, जो प्रत्येक समाजाच्या अस्तित्वाचा आधार आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(समाजशास्त्राचे अभ्यासक)
मो. - 9960103582
bagate.rajendra5@gmail.com

**निरामय पॅरालिसिस सेंटर**
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा अ‍ॅण्ड फिजिओथेरपी सेंटर
खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये
ISO 9001:2015
NGO
कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार



नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं
समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था
मोबाईल नं. 9503310568
पत्ताः गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर

**विकणे /भाड्याने देणे आहे**
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
**संपर्क : डी. बी. शिंदे**
मो.: ९५७९४२१४६५
८२७५२७४२५३
पत्ताः अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडुरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडुरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः अ‍ॅड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# केंद्रीयमंत्री मोहोळ यांच्या विमान घोटाळा? उघड!

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** पुण्यातील जैन बोर्डिंग होस्टेलच्या बेकायदा जमीन खरेदी प्रकरणात आधीच वादात अडकलेले केंद्रीय हवाई उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ पुन्हा एकदा अडचणीत येऊ शकतात. या प्रकरणातील मुख्य लाभार्थी म्हणून ओळखले जाणारे विशाल गोखले यांना मिळालेल्या फायद्याच्या मागे थेट मोहोळ यांचा सहभाग असल्याचे गंभीर आरोप होत आहेत. आणि हेच नव्हे अशाच प्रकारे यापूर्वीही एका विमान व्यवहारात



कोट्यवधींचा 'तडजोडीचा घोटाळा' झाल्याचा आरोप माजी आमदार रवींद्र धगेकर यांनी केला आहे.

### 200 कोटींची थकबाकी फक्त 2.30 कोटींमध्ये तडजोड?

जुहू विमानतळावरून कार्यरत असलेल्या मुंबई (बॉम्बे) फ्लायिंग क्लबकडून एअरपोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडिया (AAI) कडे तब्बल 200 कोटींची थकबाकी होती. नियमांनुसार क्लबकडून व्यावसायिक दरांनी शुल्क आकारले गेले असते, तर ही रक्कम वसूल होणे अपेक्षित होते. मात्र, केंद्रीय राज्यमंत्र्यांच्या हस्तक्षेपामुळे हे प्रकरण फक्त 2.30 कोटींमध्ये तडजोड करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे!

### प्रायव्हेट जेट भेट म्हणून?

आणखी धक्कादायक म्हणजे, ज्या क्लबला या तडजोडीचा फायदा झाला, त्याच मुंबई फ्लायिंग क्लबने मोहोळ यांचे व्यावसायिक सहकारी म्हणून ओळखले जाणारे विशाल गोखले यांना प्रायव्हेट जेट उपलब्ध करून दिले, अशी माहिती समोर आली आहे. या जेटद्वारे गोखले यांनी कुंभमेळ्यात प्रवास केल्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असून, धगेंकर यांनीच तो व्हिडिओ शेअर करत गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे. 'या जेट प्रवासामागे नेमकं काय काम होतं? कोणती दलाली झाली? आणि या बदल्यात मंत्रालयातील कोणते निर्णय प्रभावित झाले?' रवींद्र धगेंकर यांच्या म्हणण्यानुसार, मोहोळ यांनी आपल्या पदाचा सरळ गैरवापर करून एका खाजगी क्लबला सरकारी नुकसानातून वाचवले, आणि त्याबदल्यात त्यांच्या निकटवर्तीयांना प्रवास, सवलती व इतर लाभ मिळाले. या व्यवहारात झालेल्या अनियमिततेमुळे हवाई उड्डाण विभागाचे तब्बल 197 कोटींचे नुकसान झाल्याचा अंदाज लेखापरीक्षण अहवालात नमूद करण्यात आला आहे. या प्रकरणानंतर राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. सोशल मीडियावर 'केंद्रीय राज्यमंत्री पदाचा वापर 'कॉर्पोरेट दलाली' साठी होत आहे; आता मोहोळ यांनी राजीनामा देऊन खुलासा करावा!' अशी ही मागणी होत आहे. दरम्यान, अद्याप मुरलीधर मोहोळ किंवा विशाल गोखले यांनी या आरोपांबाबत कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र या प्रकरणाने 'सत्तेचा गैरवापर' आणि 'कॉर्पोरेट संबंधांतील सत्तासौदे' या चर्चांना पुन्हा उधाण आले आहे.

# स्व. अंकुल (गोलू) चव्हाण यांच्या स्मरणार्थ १३१ रक्तदात्यांनी केले रक्तदान

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** बार्शी शहरातील उपळाई रोड येथे स्व.अंकुल (गोलू)चव्हाण यांच्या सातव्या पुण्यतिथी निमित्त स्व.अंकुल(गोलू)चव्हाण मित्र मंडळाच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन बार्शी तालुक्याचे मा. आ.राजाभाऊ राऊत यांच्या शुभहस्ते करण्यात आले,यावेळी सर्व राजकीय व सामाजिक क्षेत्रातील प्रमुख मान्यवर, विविध मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते, शिबिरामध्ये शैला लकुळे या महिला रक्तदात्यानी त्याचे १११ वे रक्तदान केले तसेच सुहास



पाटील या रक्तदात्यानी त्याचे १०३ वे रक्तदान केले, या रक्तदान शिबिरात १३१रक्तदात्यांनी रक्तदान करून रक्तदान शिबिर यशस्वी पार पाडले. याशिबिरासाठी स्व.अंकुल(गोलू) चव्हाण मित्रपरिवार, अभिनंदन भोसले, राहुल बारंगुळे, संदेश काकडे, सुनिल शेळवणे, विक्रम पवार, रोहीत वायकर, सागर मगर, सागर मुंढे, रोहीत कातुरे, आकाश चव्हाण यांनी परिश्रम घेतले .

# जनसेवा संघटनेच्या श्रीराम अश्व प्रदर्शनाला प्रारंभ झाला

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज येथे महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटनेच्या वतीने माजी सहकार राज्यमंत्री लोकनेते स्व. प्रतापसिंह मोहिते-पाटील यांच्या स्मरणार्थ ७व्या श्रीराम अश्व प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून, २ दिवस चालणाऱ्या मारवाड जातीच्या जातिवंत अश्व प्रदर्शनाचा शुभारंभ मानसिंगराव गायकवाड यांच्या हस्ते स्व. प्रतापसिंह मोहिते-पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आला. यावेळी मानसिंगराजे भोसले, आदित्यराजे घुले, रणजितसिंह देशमुख, डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील, आशिष बोरावके, विकास बोईतुर, विराज तुपे, शांतनूलिंग खेमकर, गुरुराज कुलकर्णी, शशांक पवार, सुहास आदमाने, हर्षवर्धन तावरे, अक्षदा कुलकर्णी, विनायक सावंत, रोहन मोरे, मनीष जोशी, सागर पगारे, भारत शितोळे, नीलेश अष्टेकर, तेजस कमलाकर, सुनील पवार, आण्णासाहेब इनामदार, माणिकराव मिसाळ, आण्णासाहेब



शिंदे, सतीश पालकर,सुधीर रास्ते,नवनाथ साठे, मयुर माने, श्रीधर खटावकर, विलास लोंढे, ज्योती कुंभार,आदी उपस्थित होते.

**प्रदर्शनात २०० अश्व सहभागी**

या प्रदर्शनात तामिळनाडू, गुजराथ, पंजाब, दिल्ली, उत्तरप्रदेश, कर्नाटक व आंध्रप्रदेश, महाराष्ट्रातून मारवाड जातीचे अत्यंत देखणे जातिवंत खानदानी असे सुमारे २०० अश्व तर प्रथमच श्वान प्रदर्शनात पंजाब ग्रे हाऊंड, कारवार, पष्मी मिळून २५० श्वान सहभागी झाले आहेत. अश्व प्रदर्शन दोन दिवस चालणार असून, विविध प्रकारांत अश्वांचे प्रदर्शन होऊन उत्कृष्ट अश्वांची निवड केली जाणार आहे.

# श्री सिद्धेश्वर प्रशाला साखर कारखाना कुमठे च्या मुलींच्या बेसबॉल स्पर्धेत विजयी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका व जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झालेल्या 14 वर्षे वयोगट शहर स्तरीय बेसबॉल स्पर्धेत श्री सिद्धेश्वर प्रशालेच्या मुलींचा विजयी ठरला आहे.या संघाची विभागीय स्तरावर निवड झाली आहे सदर संघाचे कर्णधारपद धनश्री हिरेमठ हिच्याकडे होते. जबीन मुल्ला,प्राची सुंकद, प्रणिती गाडेकर, मनस्वी जाधव,सुहासिनी पिरगुंडे,शीतल किनगी, लक्ष्मीबाई सोनकडे, आकांक्षा कामशेट्टी, अर्पिता बनसोडे, पूजा रामशेट्टी, विद्या बिराजदार, राजनंदिनी माने, प्राजक्ता कांबळे, भाग्यश्री पुजारी या मुलींच्या संघाने ही कामगिरी केली. या घवघवीत यशाबद्दल यशस्वी खेळाडू व त्यांचे मार्गदर्शक क्रीडा शिक्षक सिताराम भांड यांचे श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे मार्गदर्शक संचालक तथा शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष धर्मराज काडादी, श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अण्णाराज काडादी, शालेय शिक्षण समितीचे सदस्य सिद्धाराम चाकोते, गुरुराज माळगे, शिवशंकर बिराजदार, समीर सलगर श्री सिद्धेश्वर शिक्षण संकुलाचे समन्वयक संतोष पाटील, प्रशालेचे मुख्याध्यापक काशिनाथ आकाशे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक महासिद्ध मेसे व प्रशालेतील सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.

# अकलूज नगरपरिषद, अकलूज

ता.माळिशरस,जि.सोलापूर (महाराष्ट्र)
फोन - (०२१८५) २२०३५,२२५९२
Gmail-comcakluj21@gmail.com स्थापना दिनांक ०३-०८-२०२१

जा.क्र. १४६६/अ.न.प./२०२५ दिनांक- २४/१०/२०२५

## अकलूज नगरपरिषद, अकलूज
## निविदा सूचना सन २०२५-२०२६

अकलूज नगरपरिषदेच्या भांडार विभागा मार्फत अंतर्गत खालील कामाकरिता तरी योग्य त्या कंत्राटदाराने आपले मोहर बंद निविदा दि.२७/१०/२०२५ ते ०३/११/२०२५ दु.५:०० वाजेपर्यंत मुख्याधिकारी, अकलूज नगरपरिषद यांचे कार्यालयाकडे सादर करावे. सदर कामाची कोरी निविदा दि. २७/१०/२०२५ ते ०३/११/२०२५ पर्यंत अकलूज नगरपरिषद कार्यालयात निविदा फॉर्म मिळेल.

| अ.नं. | कामाचे नाव | बयाना रक्कम | कामाचे वर्णन | निविदा फॉर्म किमंत |
|---|---|---|---|---|
| १ | अकलूज नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ कामी स्टेशनरी, छपाई व इतर अनुषंगिक साहित्य पुरवठा करणे | ५०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ५००/- |
| २ | अकलूज नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ कामी मंडप, लाईट व इतर अनुषंगिक साहित्य पुरवठा करणे. | १००००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ५००/- |
| ३ | अकलूज नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ कामी विविध प्रकारचे वाहन पुरवठा करणे. | ५०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ५००/- |
| ४ | अकलूज नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ कामी फोटो चित्रीकरण, व्हि.डी.ओ. शुटींग करणे व सिडी तयार करणे. | १००००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ५००/- |
| ५ | अकलूज नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ कामी चहा, नाष्टा, जेवण, पाण्याचे जार व इतर अनुषंगिक साहित्य पुरवठा करणे. | १००००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ५००/- |
| ६ | अकलूज नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ कामी वेबकास्टींग व सीसीटीव्ही कॅमेरा पुरवठा करणे. | ५०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ५००/- |

वरीलप्रमाणे कामा करिता इच्छुक कंत्राटदाराने आपली सिलबंद निविदा अकलूज नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत दि. २७/१०/२०२५ ते ०३/११/२०२५ या कालावधी पर्यंत सादर करावी. तसेच मुदती नंतर आलेल्या व निविदा बयाना रक्कम न भरलेल्या धारकांचा विचार केला जाणार नाही. कोणतीही निविदा अथवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार नगरपरिषेदेने राखुन ठेवला आहे.

सही
मुख्याधिकारी
अकलूज नगरपरिषद, अकलूज

# स्व. शोभाताई सोपल इंग्लिश स्कूल शाळेला जिल्हास्तरीय उपक्रमशील शाळा पुरस्कार

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** शैक्षणिक कायासीबत इतर नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात नेहमीच अग्रेसर असलेल्या बार्शी तालुक्यातील स्व. शोभाताई सोपल सेमी इंग्लिश स्कूल पांगरी या शाळेला जिल्हास्तरीय उपक्रमशील शाळा पुरस्कार ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्थेने गौरविण्यात आले. कार्यक्रम उपस्थित पाहुणे सोलापूर उपजिल्हाधिकारी अंजली मरोड, लोकव्याखाते विशाल गरड, PI बालाजी कुकडे, अजित कुंकोलोळ व राहुल वाणी यांच्या उपस्थित संपन्न झाला. कोणत्याही शाळेत महत्त्वाचे शिकवतात ते मुलांनी शिकून नौकरी मिळवावी पण या सोपल स्कूल मध्ये विद्यार्थी उद्याचा भारत सुसंस्कृत घडवण्यावर भर दिला जातो. त्यासाठी वेगवेगळे शैक्षणिक, सामाजिक, व्यावहारिक, बौद्धिक तसेच क्रीडा उपक्रम राबवले जातात. त्यामुळे



खऱ्या अर्थाने शाळा शिक्षणाची आनंदी केंद्र तयार होतील हे या शाळेने दाखवून दिले. अभ्यासा खेरीज आयुष्य जगायला लागणारी अनेक जीवनकौशल्य सहज मिळण्याचे साधन म्हणजे उपक्रम होय. या शाळेत उपक्रमामुळे छोट्या छोट्या उद्देशाची पूर्तता करत मुलांच्या मनामध्ये अभ्यासाची, चौकसतेची गोडी लावणे सहज सोपे होते हे पटवून दिले. साहजिकच शिकणे ही प्रक्रिया जबरदस्तीची न ठरता आनंददायी स्व.शोभाताई सोपल सेमी इंग्लिश या शाळेने करून दाखवली. या शाळेमध्ये वर्तमानपत्र, वैयक्तिक स्वच्छता, मोठ्याने लहानांचा अभ्यास घेणे, शंका पेटी, वृक्षारोपण व संवर्धन, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, वाढदिवस साजरा करणे, प्लास्टिक मुक्त शाळा, पुस्तक जत्रा, बाल सभा, वक्तृत्व स्पर्धा, बालबँक, ऑनलाईन क्षेत्रभेट तसेच भारतीय सनउत्सव अशा प्रकारची विविध उपक्रम घेतले जातात. स्व. शोभाताई सोपल सेमी इंग्लिश स्कूलने वृक्षारोपण, नैसर्गिक राखी प्रदर्शन, आकाश कंदील प्रदर्शन, नैसर्गिक रांगोळी प्रदर्शन, विज्ञान प्रदर्शन, महिला दिन महिला सत्कार, पत्रकार दिन पत्रकार सत्कार, महिला वर्ग शिबीर, महिला वर्ग छंद शिबीर, शोभाताई सोपल स्कॉलरशिप हे विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये शांततेने सहकार्य व ऊर्जा जनजागृती करत आहेत. या कार्यक्रमाची दखल म्हणून ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्था बार्शी यांनी संस्थेची दखल घेत जिल्हा स्तरीय उपक्रम शाळा 2025 ने पुरस्कृत केले आहे. संस्थापक व मार्गदर्शक श्री विनायक गरड सर, मुख्याध्यापिका कु सविता चांदने व शाळेतील सर्व स्टाफ यांना शाल,ट्रॉफी व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या अगोदरही *स्व. शोभाताई सोपल सेमी इंग्लिश स्कूल ला 2023 चा आदर्श शाळा पुरस्कार मिळालेला होता.याबद्दल संस्थाचालक विनायक बिभीषण गरड सरांनी शाळेतील सर्व शिक्षकांचे व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.


**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109


# ज्ञानदीप शिक्षण समूहाला राज्यस्तरीय आदर्श संस्था पुरस्कार प्राप्त

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारत सरकार आयएसओ मानांकन प्राप्त महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त ज्ञानदीप शिक्षण समूहाला दैनिक सांगोला नगरी यांच्यावतीने राज्यस्तरीय आदर्श संस्था पुरस्कार सांगोल्याचे मा आमदार दीपक आबा साळुंखे, राजा माने संपादक डिजिटल मीडिया, कार्यक्रमाचे





संयोजक संपादक सतीश सावंत यांच्या शुभहस्ते संपन्न झालाअल्पवधीतच काळामध्ये ज्ञानदीप शिक्षण समूहाने उंच भरारी घेऊन शिक्षण क्षेत्रामध्ये सोलापूर जिल्हा बरोबर राज्यामध्ये नावलौकिक केले आहे हा पुरस्कार ज्ञानदीप पब्लिक स्कूलच्या आदर्श व कर्तव्यदक्ष प्राचार्या शितल शिंदे यांनी सर्व स्टाफ सह स्वीकारला ज्ञानदीप शिक्षण समूह मधील सर्व प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विशेष करून ज्ञानदीप पब्लिक स्कूल येथील आदर्श व कर्तव्यदक्ष प्राचार्य अमृता शिंदे, प्राचार्य शितल शिंदे यांच्या सह सर्व स्टाफ आणि पालक यांनी केलेल्या विशेष सहकार्यामुळे,परिश्रमामुळे हा पुरस्कार मिळाला याचे सर्व श्रेय ज्ञानदीप शिक्षण समूहातील सर्व प्राचार्य शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांना दिले जाते 2008 साली ज्ञानदीप शिक्षण समूहाची स्थापना झाली आज तागायत सात युनिट ज्ञानदीप शिक्षण समूह अंतर्गत सुरू आहेत या पुरस्काराबद्दल सर्वत्र आनंदाचे वातावरण असून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.


(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण



**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.



**CHANGE IN NAME**

My Full Name in My Passport **TAIYAB SALIM SHAIKH**. But in My Aadhar Card, PAN Card, and Voter Card, My Name is **TAYYAB SALEEM SHAIKH**. However, I am The Same Person With Both The Names **TAIYAB SALIM SHAIKH** and **TAYYAB SALEEM SHAIKH**. However, The Name **TAYYAB SALEEM SHAIKH** Should Be Accepted.

**CHANGE IN NAME**

"I am changing my name from **Virpaksh Subhash Kurkute** "has been changed to new name **Virpash Subhash Kurkute** for passport issuance.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) नभ, गगन २) पाहुणे ३) द्रोणाचार्यांचा पुतळा समोर ठेवून धनुर्विद्या शिकणारा ४) लहान बाळाला ही टोचतात ५) भारतात सर्वाधिक साक्षरता असलेले राज्य ६) एअरफोर्स (मराठीत) ७) त्वरेने, पटकन १२) न्यूझिलंडचा एक फलंदाज १४) सेनापती १५) स्त्रियांचा नाकात घालण्याचा दागिना १६) भारताच्या उत्तरेकडील उत्तुंग पर्वत १७) खलनायक (इंग्रजीत) २१) देवाला घातलेले साकडे २२) नाहक त्रास करून घेणे २३) २६/११ च्या हल्ल्यातील दहशतवादी २४) महाराष्ट्राचे काँग्रेस आघाडी सरकारचे एक माजी मुख्यमंत्री २६) कृषी विद्यापीठ असलेले कोकणातील ठिकाण ३१) पाच दुणे ३४) लाकूड कापण्याचे साधन ३५) फळ (हिंदीत) ३६) समुद्राच्या पाण्यात असणारा एक प्राणीजीव ३७) एक म्हण- गाव करील ते ** काय करील ३८) चव ओळखणारी जिव्हा ४०) यशाचे गुपित, सूत्र ४१) परिवर्तन ४४) फळातील गोड द्रव ४५) चार आणि तीन मिळून होणारी संख्या ४७) सज्जन, प्रामाणिक


**आडवे शब्द :** १) भारतातील टी-२० क्रिकेट स्पर्धेचे नाव ५) दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांचे आडनाव ८) शर्टला बटण अडकविण्यासाठी केलेली खाच ९) सत्वयुक्त, कस असलेले १०) तरूण ११) एक जुने हिंदी गीत- ** है सुहाना, वातावरण (हिंदीत) १२) पाण्यात विहरणारा एक पांढऱ्या रंगाचा पक्षी १३) एखाद्या गोष्टीचे लागलेली वाईट सवय १६) महायुध्दाच्या काळातील जर्मनीचा हुकूमशहा १८) अश्व जोडलेले क्षत्रियाचे वाहन १९) किंमती वस्तू २०) चहा (इंग्रजीत) २१) आश्चर्य २३) रंग (इंग्रजीत) २५) वतनाचा मालक २७) दुधावरील मलई २८) आयपीएल टी-२० क्रिकेट सामन्यातील एक युवा भारतीय फलंदाज-** शॉ २९) वस उलट लिहा ३०) देव, ईश्वर (हिंदीत) ३२) सीतापती ३३) त्रास (हिंदीत) ३६) राजाला दिली जाणारी उपाधी ३९) घाई, गडबड ४२) आश्वासन, दिलेला शब्द ४३) विश्वास ४६) मुस्लिम धर्माची शिक्षण देणारी शाळा ४८) नेहमी ४९) उद्या (हिंदीत) ५०) तिखट न टाकलेले डाळीचे कालवण

## सुडोकु - 84

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | | | 5 | | 7 | | | |
| | | 6 | 2 | 3 | | 1 | | |
| 7 | 5 | 3 | 6 | | | | 4 | 8 |
| | | | 8 | | | 4 | 5 | 1 |
| 3 | | | | 6 | | 9 | | 2 |
| | 8 | 5 | | 2 | | | 3 | |
| 5 | | 1 | | | 9 | 6 | | |
| | 4 | 9 | 7 | | | | | 3 |
| 8 | 2 | 7 | | | 6 | | 9 | |

# सोलापुरात ७ ते ९ नोव्हेंबर दरम्यान प्रिसिजन गप्पांचे आयोजन

## संकर्षण व्हाया स्पृहा हा रंजक कार्यक्रम होणार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रिसिजन फाउंडेशनच्या वतीने येत्या ७, ८ आणि ९ नोव्हेंबर २०२५ रोजी शिवछत्रपती रंगभवन येथे 'प्रिसिजन गप्पा' आयोजन करण्यात आले आहेत. सोलापूरकर रसिकांना दिवाळीनंतर सांस्कृतिक गप्पांची दिवाळी अनुभवता येणार आहे, अशी माहिती प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांनी दिली. यावेळी प्रिसिजन उद्योगसमूहाचे चेअरमन यतिन शहा हे उपस्थित होते.

प्रिसिजन गप्पांचं हे १७ वे वर्ष आहे. प्रिसिजनच्या प्रथेप्रमाणे तीनही दिवस सायंकाळी ६.२५ वाजता गप्पांना प्रारंभ होईल. नेहमीप्रमाणेच शिवछत्रपती रंगभवनमध्ये या गप्पा आयोजित केल्या आहेत. यावर्षी प्रिसिजन गप्पांना शुक्रवार, दि.७ नोव्हेंबर २०२५ रोजी सुरवात होईल. पहिल्या दिवशी संकर्षण व्हाया स्पृहा' हा एक मराठी कविता आणि कथाकथन कार्यक्रम आहे. ज्यात अभिनेते संकर्षण कऱ्हाडे आणि स्पृहा जोशी सहभागी आहेत. या कार्यक्रमात कविता, किस्से आणि संकर्षण व स्पृहा यांच्यातील संवाद सादर केला जाणार आहे.

शनिवार दि.८ नोव्हेंबर रोजी गप्पांच्या दुसऱ्या दिवशी सुप्रसिद्ध कवि वैभव जोशी यांचा अपूर्वाई हा कार्यक्रम सादर होईल. अपूर्वाई हा एक वेगळा कार्यक्रम आहे. कविता, बासरी आणि गाणं यांचा त्रिवेणी संगम यात पाहायला मिळेल.या कार्यक्रमाची संकल्पना कवि वैभव जोशी यांची असून वैभव जोशी यांच्या समवेत सुप्रसिद्ध बासरी वादक अमर ओक आणि गायिका शरयू दाते यांची ही मैफल संगीत आणि कवितेचा जादुई संगम घडवते.

रविवार, दिनांक ९ नोव्हेंबर २०२५ रोजीचा दिवस सामाजिक पुरस्कारांचा असेल. यावर्षी अत्यंत वेगळ्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या दोन सामाजिक संस्थांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. यावर्षीच्या दोन्ही संस्था या देशाच्या सीमावर्ती भागात कार्य करतात. सोल्जर्स इंडिपेन्डट रिहॅबिलिटेशन फाउंडेशन या संस्थेच्या वतीने सियाचेन या जगातल्या सर्वोच्च रणभूमीवर ऑक्सिजन जनरेशन प्लान्ट सुरू करून तिथे सीमेवर दक्ष राहणाऱ्या सैनिकांच्या तसेच पर्यटक नागरिकांना या ऑक्सिजन प्लांटच्या माध्यमातून अक्षरशः श्वास दिला. याबरोबरच सैनिकांच्या विधवा पत्नी व मुलांना दत्तक घेऊन त्यांचे पुनर्वसन करण्याचं कार्य ही संस्था करते. श्रीमती सुमेधा चिथडे यांच्या या कायार्चा गौरव म्हणून त्यांना प्रिसिजन सामाजिक कृतज्ञता पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. ३ लाख रुपए आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. तर बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशन ही अधिक कदम यांची संस्थादेखील काश्मिरमध्ये दहशतवाद्यांच्या हल्ल्यात, अराजकतेमध्ये, युद्धामध्ये किंवा अन्य अशा कारवायांमध्ये अनाथ झालेल्या मुलां–मुलींच्या पुनर्वसनाचं कार्य करते. त्यांच्यासाठी आश्रम सुरू करून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले जाते. त्यांच्या कौशल्य विकासातून रोजगार निर्मिती केली जाते. मुख्य म्हणजे कुपवाडा, अनंतनाग, जम्मू अशा नेहमी अशांत असणाऱ्या भागात अधिक कदम यांचासारखा मराठी माणूस गेली ३० वर्षे कार्य करत आहे, हे विशेष कौतुकास्पद आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन प्रिसिजनचा सुभाष रावजी शहा स्मृति पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. २ लाख रुपए आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. प्रख्यात वक्ते डॉ. उदय निरगुडकर यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. पुरस्कार सोहळ्यानंतर श्रीमती सुमेधा चिथडे आणि अधिक कदम यांची मुलाखत उदय निरगुडकर हे घेणार आहेत.

रंगभवनच्या प्रांगणातही आसनव्यवस्था व एलईडी प्रोजेक्टरद्वारे कार्यक्रम पाहण्याची सोय असेल. तसेच रसिकांच्या पार्किंगची व्यवस्था वोरोनोको शाळेच्या मैदानावर करण्यात आली आहे. रसिक सोलापूरकरांनी 'प्रिसिजन गप्पां'चा मनमुराद आनंद घ्यावा, असे आवाहन डॉ. सुहासिनी शहा व यतिन शहा यांनी केले. यावेळी माधव देशपांडे उपस्थित होते.

# अतिवृष्टीग्रस्त प्रत्येक शेतकऱ्याच्या खात्यावर संपूर्ण मदत पोहोचेपर्यंत पाठपुरावा सुरूच राहील- खा. प्रणिती शिंदे



**मोहोळ, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी मोहोळ तालुक्यातील यावली आणि कुरणवाडी (गिड्डेवाडी) गावांना भेट देऊन अतिवृष्टीग्रस्त शेतकरी व ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेतल्या. या भेटीदरम्यान शेतकऱ्यांनी पिकांचे, घरांचे आणि जनावरांचे झालेल्या मोठ्या प्रमाणावरील नुकसानीबद्दल सांगत, अद्याप अनेकांना कोणतीही आर्थिक मदत न मिळाल्याची व्यथा व्यक्त केली.

खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या, 'अतिवृष्टीमुळे शेतकरी प्रचंड आर्थिक संकटात सापडले आहेत. सरकारने दिवाळीपूर्वी सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यावर मदत जमा करण्याचे आश्वासन दिले होते, मात्र दिवाळी उलटून गेली तरी अनेकांच्या खात्यात एक पैसाही जमा झालेला नाही. काहींना तुटपुंजी रक्कम देऊन सरकारने केवळ कर्तव्यपूर्तीचा दिखावा केला आहे.''शासनाच्या आश्वासनांवर विश्वास ठेवून शेतकऱ्यांनी दिवाळी गोड होईल अशी अपेक्षा ठेवली होती; परंतु त्यांच्या अंगणात अजूनही काळोखच आहे. शेतकरी आजही मदतीच्या प्रतीक्षेत आहेत. 'सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यावर संपूर्ण भरपाई तातडीने जमा करण्याची प्रक्रिया गतीमान करण्यासाठी, तसेच तांत्रिक कारणांमुळे प्रलंबित असलेल्या प्रकरणांची तात्काळ सोडवणूक करण्यासाठी आणि मदत वितरणाला गती देण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबवाव्यात, यासाठी खासदार प्रणिती शिंदे लवकरच जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करणार आहेत.

ग्रामस्थांनी अतिवृष्टीमुळे खराब झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीची मागणी केल्यावर खासदार शिंदे यांनी तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. याशिवाय घरकुल, गटारी आणि इतर स्थानिक समस्या ग्रामस्थांनी मांडल्या असून, त्या लवकरात लवकर सोडविण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

दरम्यान, खासदार प्रणिती शिंदे यांनी पूर्वीच मुख्यमंत्री यांच्याकडे ६५ मिमी पावसाची अट रद्द करून सरसकट पंचनामे करण्याची मागणी केली होती. त्यांच्या सततच्या पाठपुराव्यानंतर सरकारने ती अट रद्द केली असून, यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे याबाबत ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी खासदार प्रणिती शिंदे यांचे आभार मानले.

शेवटी खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या, 'अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या प्रत्येक शेतकऱ्याच्या खात्यावर संपूर्ण मदत पोहोचेपर्यंत माझा पाठपुरावा सुरूच राहील.'

यागावभेट दौऱ्यात तालुका अध्यक्ष सुलेमान तांबोळी, जिल्हा उपाध्यक्ष राजेश पवार, सरपंच विकास गिड्डे, जिल्हा समन्वयक मनोज यलगुलवार, सिध्देश्वर जाधव, दत्तात्रय गायकवाड, संभाजी दळवी, अभिजित दळवी, विष्णू गिड्डे, अशोक जाधव, विजय सावंत, रंगनाथ गुरव, शहाजहान मनेरी, सुनील खडके, शबाना कोरबु, दिलीप वागज, बाबा गाडे, अण्णा राऊत यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा युवा महोत्सव २०२५ साठी युवकांना ४ नोव्हेंबर पर्यंत ऑनलाइन नोंदणीचे आवाहन

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** युवकांचा सर्वांगीण विकास, भारतीय संस्कृती आणि परंपरेचे जतन, सुप्त गुणांना प्रोत्साहन तसेच राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने प्रतिवर्षी आयोजित केला जाणारा जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२५ यावर्षी ७ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. इच्छुकांनी आपली नोंदणी ४ नोव्हेंबर पर्यंत https://forms.gle/Kmof5utKSuEqL3Pb9 या गुगल फॉर्मद्वारे करावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी प्रा. मार्क धरमाई यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. राष्ट्रीय युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालयाच्या 'विकसित भारत चॅलेंज ट्रॅक' अंतर्गत या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सन २०२५–२६ मधील राष्ट्रीय युवा महोत्सव (Viksit Bharat Challenge Track) चे राष्ट्रीय आयोजन १० ते १२ जानेवारी २०२६ या दरम्यान होणार असून त्यासाठीची जिल्हास्तरीय निवड म्हणून या स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. याअंतर्गत वक्तृत्व, कथा लेखन, चित्रकला, लोकनृत्य, लोकगीत, कविता लेखन, नवोपक्रम (विज्ञान प्रदर्शन) या स्पर्धा घेण्यात येणार आहेत.

या स्पर्धेत १५ ते २९ वर्षे वयोगटातील स्पर्धक सहभागी होऊ शकतात. स्पर्धांबाबतची सविस्तर माहिती www.dsomumbaicity.blogspot.com या ब्लॉगवर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा युवा महोत्सव (स्पर्धा प्रमुख) अनिल घुगे यांच्याशी +91 95943 69561 या क्रमांकावर संपर्क साधावा.

# अकलूज येथे 331 कोटींच्या भव्य विकासकामांची सुरूवात



**वाहतुक शिस्तीची चळवळ उभी करा – खा.धैर्यशील मोहिते-पाटील**

अकलूजचा विकास हा आपल्या संस्कारांमध्ये आणि शिस्तीतही दिसला पाहिजे. स्वच्छता आणि वाहतूक शिस्त ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. वाहतूक शिस्तीबाबत देण्यात आलेली शपथ सर्वांनी काटेकोरपणे पाळणे गरज आहे. त्यासाठी आपण सर्व मिळून 'वाहतूक शिस्त चळवळ' उभी करूया आणि अकलूजला खऱ्या अर्थाने आदर्श शहर बनवूया.

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज शहराच्या सर्वांगीण विकासाचा पाया अधिक भक्कम करण्याच्या दिशेने ऐतिहासिक पाऊल उचलण्यात आले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या अमृत 2.0 तसेच सुवर्णजयंती नगरोत्थान या योजनांअंतर्गत तब्बल 331 कोटी रुपयांच्या विकासकामांची सुरूवात होत असून, या प्रकल्पांमुळे अकलूज शहराचा चेहरामोहरा बदलणार आहे.

अकलूज नगरपरिषदेअंतर्गत अमृत 2.0 योजनेअंतर्गत 211.54 कोटींचा निधी शहराच्या पाणीपुरवठा योजनेसाठी मंजूर झाला आहे. सध्या शहरात आधुनिक पाईपलाइन टाकण्याचे काम वेगाने सुरू असून, नागरिकांना अखंड, दर्जेदार आणि नियमित पाणीपुरवठा मिळावा यासाठी पाच नव्या पाणीटाक्यांच्या बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे भविष्यातील वाढती लोकसंख्या आणि पाण्याची मागणी पूर्ण करण्यासाठी सक्षम यंत्रणा उभी राहणार आहे. याचबरोबर, सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत 120 कोटींचा निधी अकलूज शहरातील रस्ते बांधकाम, सुशोभीकरण आणि मूलभूत सुविधांच्या उभारणीसाठी मंजूर करण्यात आला आहे. या योजनेच्या पहिल्या टप्प्यातील चार प्रमुख रस्त्यांचे भूमिपूजन आज पार पडले असून, हे रस्ते आधुनिक दर्जानुसार काँक्रीट स्वरूपात बांधले जाणार आहेत.

या सर्व विकासकामांच्या भूमिपूजन समारंभाचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. या प्रसंगी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, माजी सरपंच किशोरसिंह माने पाटील, माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते पाटील, क्रांतिसिंह माने पाटील, विश्वतेजसिंह मोहिते पाटील आणि सयाजीराजे मोहिते पाटील यांच्या शुभहस्ते भूमिपूजन संपन्न झाले.

शहरातील आजी–माजी सरपंच, विविध संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. भूमिपूजनानंतर झालेल्या थोडक्यातील कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी शहराच्या विकासासाठी एकदिलाने सहकार्याचे आवाहन केले.

या वेळी बोलताना आमदार रणजितसिंह मोहिते पाटील म्हणाले, अकलूजने नेहमीच प्रगतीचा मार्ग निवडला आहे. या योजनांच्या माध्यमातून पाणीपुरवठा, रस्ते आणि पायाभूत सुविधांमध्ये आमूलाग्र बदल होणार असून, अकलूज हे राज्यातील आदर्श शहर बनविण्याचा संकल्प आपण आज प्रत्यक्षात आणत आहोत.

या दोन्ही योजनांमुळे अकलूज शहराचा विकास केवळ कागदावर नव्हे, तर प्रत्यक्ष वास्तवात उतरणार आहे. जलसंधारण, पायाभूत सुविधा, स्वच्छता आणि वाहतूक व्यवस्थेच्या क्षेत्रात मोठी सुधारणा घडून येणार आहे. नागरिकांमध्ये या उपक्रमांविषयी आनंदाचे वातावरण असून, शहर प्रगतीच्या नव्या पर्वात प्रवेश करत आहे, अशी भावना व्यक्त होत आहे.

# कार्तिक यात्रेनिमित्त वाहतुक मार्गात बदल

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** कार्तिकी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात कार्तिकी शुध्द एकादशी रविवार दि. 02 नोव्हेंबर, 2025 रोजी असून, यात्रा कालावधी दि.22 ऑक्टो. ते 05 नोव्हें. असा आहे. या यात्रा कालावधीत पंढरपूर शहरातील तसेच शहरा बाहेरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक मार्गात बदल करण्यात आला आहे. हा बदल 29 ऑक्टोबर ते 05 नोव्हेंबर 2025 या कालावधीपर्यंत राहणार असून याबाबचे आदेश प्र. जिल्हा पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर दिले आहेत. पंढरपूर शहरात प्रवेश करणाऱ्या वाहनांना सूचना– पंढरपूरात यात्रे निमित्त अहिल्यानगर, बार्शी, सोलापूर, मोहोळकडून येणारी वाहने करकंब क्रॉस रोड (अहिल्यादेवी चौक) शेटफळ चौक मार्ग विसावा येथे पार्क करावीत. तसेच 65 एकर येथे फक्त दिंडी व पालखीचे वाहने पार्क करावीत. पुणे,सातारा,वाखरी,मार्गे येणारी वाहने वेअर हाऊस व इसबावी विसावा, कॉलेज क्रॉस चौकी मागील मैदानात पार्क करावीत. कराड, आटपाडी, दिघंची मार्गे येणारी वाहने वेअर हाऊस येथे पार्क करावीत. कोल्हापूर, सांगली, मिरज, सांगोला मार्गे येणारी वाहने कासेगांव फाटा मार्गे बिडारी बंगला, यमाई–तुकाई मैदान अथवा वेअर हाउस येथे पार्क करावीत. विजापूर, मंगळवेढा मार्गे येणारी वाहने कासेगांव फाटा मार्गे यमाई तुकाई मंदीर मैदान व बिडारी बंगला येथे पार्कीग करावीत.

**पंढरपूर शहरातून बाहेर जाणाऱ्या वाहनांबाबत सूचना**

पंढरपूर शहरातून टेंभुर्णी, अहिल्यानगर, सोलापूर, लातूरकडे जाणाऱ्या सर्व वाहने सावरकर चौक, नवीन कराड नाका, कॉलेज क्रॉस रोड,करकंब चौक मार्गे जातील. पुणे–साताऱ्याकडे जाणारी वाहने सरगम चौक, कॉलेज क्रॉस रोड वाखरी मार्गे जातील. तर विजापूर, कराड, आटपाडी, कोल्हापूर, सांगली, मिरज, मंगळवेढा मार्गे जाणाऱ्या सर्व गाड्या सावरकर चौक, नवीन कराड नाका, टाकळी बायपासमार्गे जातील.

**पंढरपूर शहरातील अंतर्गत वाहतुकीबाबत:**

29 ऑक्टो.ते 05 नोव्हें 2025 पर्यंत प्रदक्षिणा मार्ग, महाव्दार चौक ते शिवाजी चौक, सावरकर चौक ते शिवाजी चौक मार्ग सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद असेल. बार्शी, सोलापूर मार्गावरुन येणारी तीन रस्तामार्गे येणारी हलकी वाहने फक्त अंबाबाई पटांगणात उतरतील. नियमित ट्रक व यात्रेसाठी सोडण्यात येणाऱ्या एस.टी. बसेसना जुना दगडी पुल, नवीन पुल व तीन रस्ता मार्ग बंद ठेवण्यात येणार आहे. त्याचबरोबर मंगळवेढा नाका, महात्मा फुले चौक, या मार्गाने येणाऱ्या सर्व वाहनांना प्रवेश बंदी आहे. अंबाबाई पटांगण ते भजनदास चौक, अंबाबाई पटांगण ते अर्बन बँक, सावरकर चौक ते अर्बन बँक, लहुजी वस्ताद चौक सर्व प्रकारच्या वाहनासांठी बंद ठेवण्यात येणार आहे.

**पार्किंग व्यवस्था सूचना:**

अहिल्यानगर, बार्शी, सोलापूर, मोहोळकडून येणारी वाहने करकंब क्रॉस रोड (आहिल्या चौक), तीन रस्ता मार्गे विसावा व नगरपालिकेच्या वाहनतळावर पार्किग करतील. तसेच 65 एकर येथे दिंडी व पालखीची वाहने पार्कीग करतील. पुणे, सातारा, वाखरी, मार्गे येणारी वाहने इसबावी विसावा येथे पार्क करावीत. कराड, आटपाडी, दिघंची मार्गे येणारी वाहने वेअर हाऊस येथे पार्क करावीत. कोल्हापूर, सांगली, मिरज, सांगोला मार्गे येणारी वाहने कासेगांव फाटा, कासेगांव फाटा, बिडारी बंगला,व यमाई–तुकाई मंदीर मैदान येथे पार्क करावीत. विजापूर, मंगळवेढाकडून येणारी वाहने कासेगाव फाटा, टाकळी मार्गे वेअर हाऊस येथे पार्कीग करावीत. शहरातील अंतर्गत रोडवर कोणत्याही ठिकाणी गाड्या पार्कीग होणार नाहीत.

**एकेरी मार्ग :**

कॉलेज क्रॉस रोड ते सरगम चौक ते सावरकर चौक ते नवीन कराड नाका या मार्गावर एकेरी वाहतुक राहील. संबधित भाविकांनी व वाहनधारकांनी या बदलेल्या वाहतूक मागार्ची नोंद घेऊन वाहतूक कोंडी निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन यावलकर यांनी केले आहे.

# विजयदादांच्या हस्ते घोडे बाजार उद्घाटन संपन्न



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** कृषी उत्पन्न बाजार समिती अकलूज यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या घोडेबाजाराचे उद्घाटन माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी खा. धैर्यशील मोहिते पाटील, आ. रणजितसिंह मोहिते पाटील, आ. उत्तम जानकर, सभापती मदनसिंह मोहिते पाटील, उपसभापती मामासाहेब पांढरे, वसंतनाना देशमुख, सयाजीराजे मोहिते पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सभापती मदनदादा यांनी केले. गत दोन महिन्यापासून व्यापाऱ्यांनी आपल्या घोड्यासह अकलूजला येण्यास सुरुवात केली असून आजतागायत ७२० घोडे बाजारात आले असून साधारणतः शंभर घोड्यांची विक्री झाली आहे. त्यामध्ये कोट्यवधी रुपयांची उलाढाल झाली आहे. पंढरपूरच्या कार्तिक वारीपर्यंत ही आवक अशीच चालू राहणार असून अकलूजच्या घोडे बाजारात अजून दीड ते दोन महिने हे घोडे विक्रीसाठी उपलब्ध असल्याचेही त्यांनी सांगितले. खा. धैर्यशील मोहिते पाटील यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, आपल्याकडे घोड्याचा सांभाळ योग्य पद्धतीने केला जात नसून, घोडे ही दारात बांधण्याची किंवा शोभेची वस्तू नसून त्यांचा काळजीपूर्वक सांभाळ केला पाहिजे. तसेच घोड्यांना योग्य पद्धतीने नाल मारणे त्यांचा औषधोपचार, त्यांची निगा याबाबत संपूर्ण महाराष्ट्र मध्ये ज्या ठिकाणी घोडेबाजार भरतो त्या ठिकाणी याबाबत शिबिर भरवण्याचेही प्रस्तावित असल्याचे त्यांनी सांगितले. आगामी काळात घोड्यांच्या नृत्य स्पर्धा घेण्यासह घोड्यांची धावण्याची स्पर्धा घेतल्यास त्याचा फायदा होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

याप्रसंगी महाराष्ट्र राज्यासह देशभरातून आलेले व्यापारी, घोडेशौकीन, परिसरातील नागरिक,सचिव राजेंद्र काकडे, सर्व संचालक मंडळ यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनंजय देशमुख यांनी केले.

# साडेसात फूटी अजगराचे यशस्वी रेस्क्यू ऑपरेशन; नैसर्गिक अधिवासात मुक्त



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरजवळील धोत्री (ता. दक्षिण सोलापूर) येथील गोकुळ शुगर इंडस्ट्रीज लिमिटेड परिसरात दिनांक 19 ऑक्टोबर रोजी तब्बल 7.5 फूट लांबीचा अजगर आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. कंपनीतील सुरक्षा अधिकारी विद्यान गजधाने यांना हा अजगर सर्वप्रथम दिसला. त्यांनी तात्काळ स्थानिक सर्पमित्र नागेश बिराजदार यांना या घटनेची माहिती दिली. स्थानिक सर्पमित्रांनी घटनास्थळी पोहोचून या सापास ताब्यात घेतले.

अजगर हा साप प्रथमच त्यांना आढळून आल्याने त्यांनी याची माहिती सोलापूरचे सर्प अभ्यासक राहुल शिंदे यांना दिली. माहिती मिळताच राहुल शिंदे व नाग फाउंडेशनचे अध्यक्ष अनिल अलदार व टीमने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. सापाची अधिक पाहणी केल्यावर हा साप सुदृढ असल्याचे निश्चित झाले. यावेळी स्थानिक सर्पमित्र राजकुमार बिराजदार, अमोल बिराजदार, मल्लिकार्जुन हीरोळे आणि नागेश बिराजदार यांनी या रेस्क्यू ऑपरेशनमध्ये मोलाची मदत केली. सोलापूर जिल्ह्यात अतिशय दुर्मिळ असणारा हा साप असून हा वन्यजीव अधिनियम 1972 च्या कायद्याअंतर्गत अनुसूची 1(शेड्युल 1) मध्ये समाविष्ट असल्याने याला एखाद्या वाघा ईतकेच संरक्षण प्राप्त होते. यामुळे या घटनेची माहिती सहाय्यक उपवनसंरक्षक अजित शिंदे, वन परिक्षेत्र अधिकारी प्रवीण गांगुर्डे आणि वनरक्षक श्रीशैल पाटील यांना कळविण्यात आली व त्यांच्या मार्गदर्शनाखाली हे रेस्क्यू ऑपरेशन अत्यंत सुरक्षितपणे पार पडले. सर्पमित्रांनी अतिशय काळजीपूर्वक या अजगराला पकडले आणि त्याला तात्काळ त्याच्या नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे मुक्त करण्यात आले. यावेळी गोकुळ शुगर्सचे रावसाहेब गदादे, अरविंद जंगाले व कर्मचारी तसेच वनसेवक बसवराज हिरोळे आणि सोलापूरचे सर्पमित्र संतोष धाकपाडे व शिवानंद हिरेमठ हेही उपस्थित होते.

अजगर हा साधारणपणे जंगले, खडकाळ प्रदेश, नदीकाठचे घनदाट झुडपे किंवा शेताजवळील उसाच्या लागवडीमध्ये उष्णता आणि लपण्यासाठी जागा शोधत असतो. सोलापुरात मागच्या महिन्यात आलेल्या पुरामुळे अजगरांसारख्या प्राण्यांचे स्थलांतर झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. शिवाय सोलापुरात अजगर आढळल्याची नोंद बोटावर मोजण्याइतकी असली तरी धोत्री आणि करजगी या भागाचा अभ्यास केल्यास, भीमा नदीचा परिसर आणि तेथील नैसर्गिक वनांमुळे या सापांना अनुकूल अधिवास (Habitat) मिळतो. वनविभागाने या घटनेची तत्परता दाखवत आमच्या टीमला तात्काळ सहकार्य केल्याने हा अजगर मानवी हद्दीतून त्वरित त्याच्या नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यास जलदगती मिळाली.

**सर्प अभ्यासक**
**राहुल शिंदे, सोलापूर**

हा साडेसात फुटी अजगर खूपच मोठा आणि सशक्त होता. गोकुळ शुगर इंडस्ट्रीज पासून धोत्री गाव 2 किलोमीटरवर असून मानवी वस्तीजवळ तो आल्याने त्याला तात्काळ रेस्क्यू करणे आवश्यक होते. अशा मोठ्या सापाला पकडताना त्याच्या सुरक्षिततेला आणि पकडणाऱ्या व्यक्तीच्या सुरक्षिततेला महत्त्व देणे गरजेचे असते. आमच्या टीमने या अजगरास अत्यंत शांतपणे आणि शास्त्रीय पद्धतीने रेस्क्यू करून तेथील उपस्थितांमध्ये सापांबद्दल जनजागृती करण्यात आली. सापाला त्याच्या नैसर्गिक अधिवासात सोडल्यामुळे पर्यावरणाचे संतुलन राखले जाईल.

**अनिल अलदार,**
**अध्यक्ष, नाग फाउंडेशन**

अजगर हा भारतीय वन्यजीव संरक्षण अधिनियम, 1972 च्या शेड्यूल क (अनुसूची १) मध्ये समाविष्ट असलेला अत्यंत महत्त्वाचा आणि संरक्षित प्राणी आहे. या कायद्यामुळे अजगराला मारणे, पकडणे किंवा त्याचा छळ करणे हा गंभीर गुन्हा आहे. पर्यावरणातील उंदिर, घुस आणि लहान सस्तन प्राण्यांवर नियंत्रण ठेवणारा हा प्राणी अन्नसाखळीतील एक महत्त्वाचा घटक आहे. गोकुळ शुगर इंडस्ट्रीज व्यवस्थापन, रावसाहेब गदादे व अरविंद जंगाले, वनसेवक बसवराज हिरोळे तसेच सर्प अभ्यासक राहुल शिंदे आणि नाग फाउंडेशनचे अध्यक्ष अनिल अलदार यांच्या संपूर्ण टीमने रेस्क्यू ऑपरेशन यशस्वी पार पाडले याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो.

श्रीशैल पाटील वनरक्षक, सोलापूर.

# भाविकांना सुलभ व जलद दर्शनासाठी शासनाच्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करावे – जिल्हाधिकारी आशीर्वाद

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** कार्तिक शुद्ध एकादशीला पंढरपूर शहरात मोठ्या प्रमाणात यात्रा भरते. कार्तिकी शुध्द एकादशी रविवार दि. 02 नोव्हेंबर, 2025 रोजी असून, दि.26 ऑक्टो. ते 05 नोव्हें. या यात्रा कालावधीत दर्शनरांगेतील भाविकांचे जलद व सुलभ दर्शन होण्याच्या दृष्टीने शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनांचे तंतोतंत व काटेकोरपणे पालन करावे. तसेच दर्शनरांगेचे सुयोग्य नियोजन करून सर्वसामान्य भाविकांना शांततेने दर्शन देण्याची व्यवस्था करावी. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी संबधित विभागाला दिले आहेत.

शासनाने उत्सवाच्या दिवशी व इतर महत्वाच्या दिवशी कोणत्याही मंदिरामध्ये भाविकांना दर्शन देण्याबाबत शासन निर्णय क्र. संकीर्ण–२०१०/३५/(प्र.क्र.८५)/का. सोळा दि.०७/०९/२०१० अन्वये मार्गदर्शक सुचना केलेल्या आहेत. राज्यातील महत्वाच्या मंदिरांमध्ये उत्सवाच्या वेळी व इतर महत्वाच्या दिवशी काही भक्तांना नियमित प्रवेशद्वारातून न सोडता इतर प्रवेशद्वारातून दर्शनासाठी प्रवेश दिला जात असल्याने गर्दीच्या वेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याच्या अनेक तक्रारी प्रसारमाध्यमांद्वारे व प्रत्यक्ष प्राप्त होतात. अनेक देवस्थानांमध्ये उत्सवांच्या दिवशी अथवा इतर महत्वाच्या दिवशी व्ही.आय.पी. दर्शन तसेच काही ठिकाणी शुल्क, देणगी इ. आकारुन दर्शन दिले जाते. सर्व महत्वाच्या देवस्थानांमध्ये सर्वसामान्य भाविकांना समानतेने व शांततेने दर्शन दिले जावे व कोणत्याही भाविकास अन्य मार्गाने दर्शन – देण्यात येऊ नये तसेच रांगेचे सुयोग्य पद्धतीने नियोजन करणे आवश्यक आहे.

देवस्थानातील उत्सवाच्या दिवशी तसेच इतर महत्वाच्या दिवशी कोणत्याही व्यक्तीस नियमित रांगेव्यतिरिक्त अन्य कोणत्याही मार्गाने दर्शन घेण्यास परवानगी देण्यात येऊ नये व तशी. कोणतीही स्वतंत्र व्यवस्था करण्यात येऊ नये. देवस्थानांमध्ये उत्सवाच्या दिवशी व इतर महत्वाच्या दिवशी कोणत्याही मार्गाने (शुल्क, देणगी, फी इ.) रक्कम आकारुन दर्शनासाठी प्रवेश देण्यात येऊ नये. देवस्थान समितीने संबंधित देवस्थानातील महत्वाचा उत्सवाचा दिवस व गदीर्चा दिवस कोणता आहे. याबाबत दर्शनी भागावर स्पष्टपणे दिसेल अशा प्रकारे ठळक अक्षरात फलक लावणे बंधनकारक राहील. तसेच याबाबत समितीने संबंधित सहायक धमार्दाय आयुक्तांना माहिती देणे आवश्यक राहील. देवस्थान समितीने महत्वाच्या सणाच्या दिवशी व इतर केव्हाही दर्शनाकरिता पासेस वा प्रवेश पत्रिका वितरीत करु नयेत. कोणत्याही देवस्थानांमध्ये उत्सवाच्या व इतर महत्वाच्या दिवशी सर्व भाविकांना समानतेने एकाच रांगेतून प्रवेश देण्यात यावा, तसेच विश्वस्त, अधिकारी व पोलीस यांनी आपल्या पदांचा दुरुपयोग करुन भक्तांना सामान्य, रांगेंव्यतिरिक्त इतर कोणत्याही मागार्ने प्रवेश देऊ नये. असेही शासन निर्णयात नमुद केले आहे. सदर शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनांचे उल्लंघन झाल्यास राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये कारवाई करण्यात येईल याची संबधितांनी नोंद घ्यावी अशा सूचनाही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्या आहेत.

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
**महिला व बालकल्याण समिती विभाग**
**जाहिर प्रसिध्दिकरणाचा मसुदा**

महिला व बालकल्याण समिती विभागाच्या वतीने म.न.पा हददीतील मुली व महिला करिता सौंदर्य शास्त्र (ब्युटीपार्लर) प्रशिक्षण देणेकामी जाहिर प्रसिध्दीकरणाद्वारे दोन लिफाफा पध्दतीने (१. कागदपत्रे. २. दरपत्रक) निविदा मागविणे बाबत.

१) म.न.पा संकेतस्थळ अ.क्र. ३०

सदर कामाचे टेंडर सोलापूर महानगरपालिकेच्या www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावरून दिनांक २७/१०/२०२५ ते ०३/११/२०२५ पर्यंत पाहण्यास उपलब्ध आहे.

**सही**
**प्रभारी महिला बालकल्याण अधिकारी**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**